रजिस्ट्री सं. डी–221

Price : Rs. 5.00
REGISTERED No. D-221
नोंदणी क्रमांक डी-221

# भारत का राजपत्र
# The Gazette of India
# भारताचे राजपत्र

असाधारण
EXTRAORDINARY
असाधारण

भाग 12 अनुभाग 1
Part XII Section 1
भाग बारा अनुभाग १

प्राधिकार से प्रकाशित
PUBLISHED BY AUTHORITY
प्राधिकाराद्वारे प्रकाशित

सं० 3] नई दिल्ली, 11 नवम्बर, 1993/20 कार्तिक (शके) 1915 [खंड 4
No. 3] NEW DELHI, 11TH NOVEMBER, 1993/20 KARTIKA (SAKA) 1915 [Vol. 4
अंक ३] नवी दिल्ली, ११ नोव्हेंबर, १९९३/२० कार्तिक (शके) १९१५ [खंड ४

स्वतंत्र संकलन म्हणून फाईल करण्यासाठी या भागाला वेगळे पृष्ठ क्रमांक दिले आहेत.

## विधि और न्याय मंत्रालय

(विधायी विभाग)

नई दिल्ली, दिनांक 11 नवम्बर 1993/20 कार्तिक (शक) 1915

(1) दि ज्युवेनाईल जस्टिस एक्ट, 1986, (2) दि स्टँडर्ड्स ऑफ वेट्स अँड मेजर्स (एन्फोर्समेंट) एक्ट, 1985, (3) दि प्रिव्हेंशन ऑफ करप्शन एक्ट, 1988, (4) प्रोटेक्शन ऑफ सिविल राईट्स एक्ट, 1955 के मराठी अनुवाद राष्ट्रपति के प्राधिकार से प्रकाशित किये जाते हैं और प्राधिकृत पाठ (केंद्रिय विधि) अधिनियम, 1973 (1973 का 50) की धारा 2 के खंड (क) के अधीन ये मराठी भाषा में उनके प्राधिकृत पाठ समझे जाएंगे।

## MINISTRY OF LAW AND JUSTICE
(LEGISLATIVE DEPARTMENT)

New Delhi, dated 11th November 1993/20 Kartika (Saka) 1915

The Translations in Marathi of (1) The Juvenile Justice Act, 1986, (2) The Standards of Weights and Measures (Enforcement) Act, 1985, (3) The Prevention of Corruption Act, 1988, (4) Protection of Civil Rights Act, 1955 are hereby published under the authority of the President and shall be deemed to be the authoritative texts thereof in Marathi under clause (*a*) of section 2 of the Authoritative Texts (Central Laws), Act, 1973 (50 of 1973).

# बाल न्याय अधिनियम, १९८६
## (१९८६ चा अधिनियम, क्रमांक ५३)

[१ डिसेंबर १९८६]

उपेक्षित किंवा अपचारी बालांची काळजी घेणे, त्यांचे संरक्षण, त्यांच्यावर उपचार, त्यांचा विकास व पुनर्वसन यांसाठी आणि अपचारी बालांशी संबंधित विवक्षित बाबींच्या अभिनिर्णयासाठी आणि त्यांच्या पुढील व्यवस्थेसाठी उपबंध करण्याकरिता अधिनियम.

भारतीय गणराज्याच्या सदतिसाव्या वर्षी संसदेकडून पुढीलप्रमाणे अधिनियमित होवो :--

### प्रकरण १ले
### प्रारंभिक

संक्षिप्त नाव, विस्तार व प्रारंभ.

१. (१) या अधिनियमास "बाल न्याय अधिनियम, १९८६" असे म्हणता येईल.

(२) त्याचा विस्तार जम्मू व काश्मीर राज्य खेरीजकरून संपूर्ण भारतभर आहे.

(३) केंद्र शासन, शासकीय राजपत्रातील अधिसूचनेद्वारे नियत करील अशा दिनांकास तो अंमलात येईल आणि या अधिनियमाच्या निरनिराळ्या उपबंधांसाठी आणि निरनिराळ्या राज्यांसाठी निरनिराळे दिनांक नियत करता येतील.

व्याख्या.

२. या अधिनियमात संदर्भानुसार अन्यथा आवश्यक नसेल तर,---

(क) "भीक मागणे" याचा अर्थ,---

(एक) एखाद्या सार्वजनिक ठिकाणी भीक मागणे किंवा ती घेणे अथवा भीक मागण्यासाठी किंवा ती घेण्यासाठी कोणत्याही खाजगी वास्तूमध्ये प्रवेश करणे, असा आहे---मग असा प्रवेश गाणे म्हणण्याच्या, नृत्य करण्याच्या, भविष्य सांगण्याच्या, करामती दाखवण्याच्या किंवा चीजवस्तू विकण्याच्या बहाण्याने असो किंवा अन्यथा असो;

(दोन) भीक मिळवण्याच्या किंवा उकळण्याच्या उद्देशाने कोणतेही क्षत, जखम, इजा, व्यंग किंवा रोग---मग तो स्वतःचा असो, वा अन्य कोणत्याही व्यक्तीचा किंवा एखाद्या प्राण्याचा असो---उघडयावर टाकणे किंवा त्याचे प्रदर्शन करणे;

(तीन) भीक मागण्याच्या किंवा ती घेण्याच्या प्रयोजनार्थ स्वतःचा एक प्रदर्शनीय वस्तू म्हणून उपयोग करू देण्यास मुभा देणे;

(ख) "मंडळ" याचा अर्थ, कलम ४ अन्वये घटित झालेले बाल कल्याण मंडळ, असा आहे;

(ग) "कुंटणखाना", "वेश्या", "वेश्याव्यवसाय" आणि "सार्वजनिक ठिकाण" यांचा, "स्त्रिया व मुली अपव्यापार दमन अधिनियम, १९५६" (१९५६ चा १०४) यामध्ये त्यांना अनुक्रमे जे अर्थ नेमून देण्यात आलेले आहेत तेच अर्थ असतील;

(घ) "सक्षम प्राधिकरण" याचा अर्थ, उपेक्षित बालांच्या संबंधात, मंडळ आणि अपचारी बालांच्या संबंधात, बाल न्यायालय, असा आहे आणि जेथे असे मंडळ किंवा बाल न्यायालय घटित झालेले नसेल तेथे, कलम ७ च्या पोटकलम (२) अन्वये मंडळाला किंवा बाल न्यायालयाला प्रदान करण्यात आलेल्या शक्तींचा वापर करण्याची शक्ती प्रदान करण्यात आलेल्या कोणत्याही न्यायालयाचा समावेश आहे;

(ङ) "अपचारी बाल" याचा अर्थ, ज्याने अपराध केला असल्याचे आढळून आलेले आहे असा बाल, असा आहे;

(च) "योग्य व्यक्ती" किंवा "योग्य संस्था" याचा अर्थ, सक्षम प्राधिकरणाकडून विनिर्दिष्ट करण्यात आलेल्या अटींवर व शर्तींवर, काळजी घेण्यासाठी आणि संरक्षणासाठी सोपवण्यात येईल अशा एखाद्या बालास ताब्यात घेण्यासाठी व त्याची काळजी घेण्यासाठी जी योग्य असल्याचे सक्षम प्राधिकरणास आढळून आले असेल अशी कोणतीही योग्य व्यक्ती किंवा योग्य संस्था (पोलीस ठाणे किंवा तुरुंग नसलेली) असा आहे;

(छ) एखाद्या बालाच्या संबंधात "पालक" यामध्ये सक्षम प्राधिकरणाच्या मते, त्या बालाच्या संबंधातील कोणत्याही कार्यवाहीची दखल असलेल्या व त्या काळापुरता त्याचा प्रत्यक्ष ताबा किंवा नियंत्रण जिच्याकडे आहे अशा कोणत्याही व्यक्तीचा समावेश होतो;

(ज) "बाल" याचा अर्थ, ज्याचे वय सोळा वर्षे झालेले नाही असा मुलगा किंवा जिचे वय अठरा वर्षे झालेले नाही अशी मुलगी, असा आहे;

(झ) "बाल न्यायालय" याचा अर्थ, कलम ५ अन्वये घटित करण्यात आलेले एखादे न्यायालय, असा आहे;

(ञ) "बाल गृह" याचा अर्थ, राज्य शासनाने कलम ९ अन्वये बाल गृह म्हणून स्थापन केलेली किंवा प्रमाणित केलेली एखादी संस्था, असा आहे;

(ट) "गुंगीकारक औषधिद्रव्ये" आणि "मन:प्रभावी पदार्थ" या शब्दांना, "गुंगीकारक औषधिद्रव्ये व मन:प्रभावी पदार्थ अधिनियम, १९८५" (१९८५ चा ६१) यामध्ये अनुक्रमे जे अर्थ नेमून देण्यात आलेले आहेत तेच अर्थ असतील;

(ठ) "उपेक्षित बाल" याचा अर्थ,—

(एक) जो भीक मागत असल्याचे आढळून आले आहे; किंवा

(दोन) ज्याला कोणतेही घर किंवा राहण्याचे ठराविक ठिकाण नसल्याचे आणि चरितार्थाचे दरकरणी कोणतेही साधन नसल्याचे आणि जो निराधार असल्याचे आढळून आले आहे;

(तीन) ज्या बालावर नियंत्रण ठेवण्यास त्याचा पिता किंवा त्याची माता किंवा पालक अयोग्य किंवा असमर्थ आहे; किंवा

(चार) जो कुंटणखान्यात किंवा एखाद्या वेश्येबरोबर रहात असेल किंवा वेश्या-व्यवसायासाठी उपयोग केल्या जाणाऱ्या कोणत्याही ठिकाणी वारंवार जात असेल अथवा कोणत्याही वेश्येच्या किंवा जी अनैतिक, दारूच्या नशेत वा दुराचारी आयुष्य घालवीत आहे अशा इतर कोणत्याही व्यक्तीच्या सहवासात असल्याचे आढळून आले आहे;

(पाच) अनैतिक किंवा अवैध प्रयोजनांसाठी किंवा सद्विवेक विरोधी लाभासाठी ज्याचा दुरुपयोग किंवा शोषण केले जात आहे किंवा केले जाण्याची शक्यता आहे

असा बाल, असा आहे.

(ड) "अभीक्षण गृह" याचा अर्थ, राज्य शासनाने कलम ११ अन्वये अभीक्षण गृह म्हणून स्थापन केलेली किंवा मान्यता दिलेली कोणतीही संस्था किंवा ठिकाण असा आहे;

(ढ) "अपराध" याचा अर्थ, त्या त्या वेळी अंमलात असलेल्या कोणत्याही कायद्यान्वये शिक्षापात्र असलेला अपराध, असा आहे;

(ण) "सुरक्षिततेचे ठिकाण" याचा अर्थ, असे कोणतेही ठिकाण किंवा संस्था (पोलीस ठाणे किंवा तुरुंग नसलेली) की, जिची प्रभारी व्यक्ती एखाद्या बालाचा स्वेच्छापूर्वक तात्पुरता स्वीकार करण्यास आणि त्याची काळजी घेण्यास तयार आहे आणि जे सक्षम प्राधिकरणाच्या मते, त्या बालासाठी सुरक्षिततेचे ठिकाण आहे, असा आहे;

(त) "विहित" याचा अर्थ, या अधिनियमान्वये करण्यात आलेल्या कोणत्याही नियमाद्वारे विहित, असा आहे;

(थ) "परिवीक्षा अधिकारी" याचा अर्थ, या अधिनियमान्वये किंवा "अपराधी परिवीक्षा अधिनियम, १९५८" (१९५८ चा २०) अन्वये नियुक्त करण्यात आलेला परिवीक्षा अधिकारी, असा आहे;

(द) "विशेष गृह" याचा अर्थ, राज्य शासनाने कलम १० अन्वये स्थापन केलेली किंवा प्रमाणित केलेली संस्था, असा आहे;

(ध) कोणताही पिता किंवा माता, पालक किंवा या अधिनियमाखालील अन्य योग्य व्यक्ती किंवा योग्य संस्था ज्याची काळजी घेत असेल अशा एखाद्या बालाच्या संबंधात याचा अर्थ (त्या बालाची काळजी योग्यरित्या घेतली जात असून सक्षम प्राधिकरणाने लादलेल्या शर्तींचे पालन केले जात आहे याबद्दल खात्री करून घेण्यासाठी एखाद्या परिवीक्षा अधिकाऱ्यांकडून केली जाणारी त्या बालाची देखरेख, असा आहे);

(न) या अधिनियमात वापरलेले परंतु व्याख्या न केलेले आणि "फौजदारी प्रक्रिया संहिता १९७३" (१९७४ चा २) यामध्ये व्याख्या केलेले सर्व शब्द आणि शब्दप्रयोग यांना अनुक्रमे त्या संहितेमध्ये नेमून दिल्याप्रमाणे अर्थ असतील.

**एखाद्या बाल न राहिलेल्या बालाच्या बाबतीत चौकशी चालू ठेवणे.**

३. ज्यावेळी एखाद्या बालाच्या विरुद्ध चौकशी सुरू करण्यात आली असेल आणि अशा चौकशीच्या काळात तो बाल, बाल राहिला नसेल त्यावेळी या अधिनियमात किंवा त्या त्या वेळी अंमलात असलेल्या अन्य कोणत्याही कायद्यामध्ये काहीही अंतर्भूत असले तरी, ती चौकशी चालू ठेवता येईल आणि ती व्यक्ती ही जणू काही अजूनही बालच असल्याप्रमाणे अशा व्यक्तीच्या बाबतीत आदेश देता येतील.

## प्रकरण २रे

### बालांसाठी सक्षम प्राधिकरणे आणि संस्था

**बाल कल्याण मंडळे.**

४. (१) राज्य शासन, शासकीय राजपत्रातील अधिसूचनेद्वारे त्या अधिसूचनेत विनिर्दिष्ट करण्यात आलेल्या कोणत्याही क्षेत्रासाठी एक किंवा अधिक बाल कल्याण मंडळे, या अधिनियमान्वये उपेक्षित बालांच्या संबंधात अशा मंडळांना प्रदान केलेल्या शक्तींचा वापर करण्यासाठी आणि त्यांना नेमून दिलेली कर्तव्ये पार पाडण्यासाठी घटित करू शकेल.

(२) मंडळ, अध्यक्ष आणि राज्य शासनाला नियुक्ती करणे योग्य वाटेल असे इतर सदस्य यांचे बनलेले असेल व त्यांपैकी किमान एक सदस्य महिला असेल आणि अशा प्रत्येक सदस्याकडे "फौजदारी प्रक्रिया संहिता, १९७३" (१९७४ चा २) खालील दंडाधिकाऱ्याच्या शक्ती निहित केलेल्या असतील.

(३) मंडळ, दंडाधिकाऱ्यांचे न्यायपीठ म्हणून कार्य करील आणि त्यास "फौजदारी प्रक्रिया संहिता, १९७३" (१९७४ चा २) अन्वये एखाद्या महानगर दंडाधिकाऱ्याला किंवा, प्रकरणपरत्वे, एखाद्या प्रथम वर्ग न्याय दंडाधिकाऱ्याला प्रदान करण्यात आलेल्या शक्ती असतील.

५. (१) "फौजदारी प्रक्रिया संहिता, १९७३" (१९७४ चा २) यामध्ये काहीही अंतर्भूत असले तरी, राज्य शासन, शासकीय राजपत्रातील अधिसूचनेद्वारे त्या अधिसूचनेत विनिर्दिष्ट करण्यात आलेल्या कोणत्याही क्षेत्रासाठी एक किंवा अधिक बाल न्यायालय, या अधिनियमान्वये अपचारी बालांच्या संबंधात, अशा न्यायालयांना प्रदान केलेल्या शक्तींचा वापर करण्यासाठी किंवा त्यांना नेमून दिलेली कर्तव्ये पार पाडण्यासाठी घटित करू शकेल. **बाल न्यायालये.**

(२) बाल न्यायालय, राज्य शासनाला नियुक्त करणे योग्य वाटेल इतके महानगर दंडाधिकारी किंवा, प्रकरणपरत्वे, प्रथम वर्ग न्याय दंडाधिकारी यांचे मिळून बनलेले असेल व त्यांचे एक न्यायपीठ बनेल. त्यांपैकी, एका व्यक्तीला मुख्य दंडाधिकारी म्हणून पदनामित केले जाईल आणि अशा प्रत्येक न्यायपीठाला फौजदारी प्रक्रिया संहिता, १९७३ (१९७४ चा २) अन्वये महानगर दंडाधिकारी किंवा, प्रकरणपरत्वे, प्रथम वर्ग न्याय दंडाधिकारी याला प्रदान करण्यात आलेल्या शक्ती असतील.

(३) प्रत्येक बाल न्यायालयाला विहित करण्यात येतील अशा अर्हता असणाऱ्या दोन मानसेवी सामाजिक कार्यकर्त्यांचा एक पॅनल सहाय्य करील व त्या कार्यकर्त्यांपैकी किमान एक महिला असेल आणि असे पॅनल राज्य शासनाकडून नियुक्त केले जाईल.

६. (१) मंडळाचे सदस्य किंवा बाल न्यायालयाचे दंडाधिकारी यांच्यामध्ये कोणताही मतभेद उद्भवल्यास, बहुमत अधिभावी होईल, परंतु, असे बहुमत नसेल तेव्हा, अध्यक्ष किंवा, प्रकरणपरत्वे, मुख्य दंडाधिकारी यांचे मत अधिभावी होईल. **मंडळे व बाल न्यायालये यांच्या संबंधातील कार्यपद्धती इत्यादी.**

(२) मंडळाचा कोणताही सदस्य किंवा, प्रकरणपरत्वे, बाल न्यायालयाचा कोणताही दंडाधिकारी अनुपस्थित असला तरीही, मंडळ किंवा बाल न्यायालय काम करू शकेल आणि मंडळाने किंवा बाल न्यायालयाने दिलेला कोणताही आदेश, कार्यवाहीच्या कोणत्याही टप्प्यावर कोणताही सदस्य किंवा, प्रकरणपरत्वे, दंडाधिकारी अनुपस्थित होता एवढ्या एकाच कारणास्तव विधिबाह्य ठरणार नाही.

(३) कोणत्याही व्यक्तीची, राज्य शासनाच्या मते तिला बालक मानसशास्त्र किंवा बाल कल्याण यांचे विशेष ज्ञान असल्याखेरीज मंडळाचा सदस्य म्हणून किंवा बाल न्यायालयातील दंडाधिकारी म्हणून नियुक्ती केली जाणार नाही.

७. (१) ज्यावेळी कोणत्याही क्षेत्रासाठी एखादे मंडळ किंवा एखादे बाल न्यायालय घटित करण्यात आले असेल त्यावेळी, असे मंडळ किंवा न्यायालय याला, त्या त्या वेळी अंमलात असलेल्या अन्य कोणत्याही कायद्यामध्ये काहीही अंतर्भूत असले तरी, परंतु या अधिनियमात स्पष्टपणे अन्यथा उपबंधित केले असेल ते खेरीजकरून, या अधिनियमाखालील उपेक्षित बाल किंवा, प्रकरणपरत्वे, अपचारी बाल यांच्या संबंधातील सर्व कार्यवाहींच्या बाबतचे केवळ कामकाज चालवण्याची शक्ती असेल : **मंडळ व बाल न्यायालय यांच्या शक्ती.**

परंतु, प्रकरणाची परिस्थिती लक्षात घेता, तसे करणे एखाद्या मंडळास किंवा बाल न्यायालयास, आवश्यक वाटत असेल तर, त्यास कोणतीही कार्यवाही, कोणत्याही बाल न्यायालयाकडे किंवा, प्रकरणपरत्वे मंडळाकडे हस्तांतरित करता येईल :

परंतु आणखी असे की, ज्यावेळी पहिल्या परंतुकान्वये कोणत्याही कार्यवाहीच्या हस्तांतरणासंबंधात एखादे मंडळ आणि एखादे बाल न्यायालय यांच्यामध्ये कोणताही मतभेद असेल त्यावेळी, ती बाब, निर्णयार्थ मुख्य महानगर दंडाधिकाऱ्यांकडे किंवा मुख्य न्याय दंडाधिकाऱ्याकडे निर्देशित करण्यात येईल. आणि ज्यावेळी जिल्हा दंडाधिकारी, एखादे मंडळ किंवा बाल न्यायालय म्हणून काम करत असेल त्यावेळी, अशा मतभेदाची बाब, सत्र न्यायालयाकडे निर्देशित करण्यात येईल. आणि मुख्य महानगर दंडाधिकाऱ्याचा किंवा मुख्य न्याय दंडाधिकाऱ्यांचा किंवा, प्रकरणपरत्वे, सत्र न्यायालयाचा अशा निर्देशावरील निर्णय अंतिम असेल.

(२) ज्यावेळी कोणत्याही क्षेत्रासाठी मंडळ किंवा बाल न्यायालय घटित करण्यात आले नसेल त्यावेळी, या अधिनियमाद्वारे किंवा तदन्वये मंडळाला किंवा बाल न्यायालयाला प्रदान करण्यात आलेल्या शक्तींचा त्या क्षेत्रामध्ये खालील व्यक्तींकडून वापर केला जाईल. त्या व्यक्ती म्हणजे :—

(क) जिल्हा दंडाधिकारी; किंवा

(ख) उप विभागीय दंडाधिकारी; किंवा

(ग) कोणताही महानगर दंडाधिकारी किंवा, प्रकरणपरत्वे, प्रथमवर्ग न्याय दंडाधिकारी.

(३) या अधिनियमाद्वारे किंवा तदन्वये मंडळास किंवा बाल न्यायालयास प्रदान करण्यात आलेल्या शक्तींचा वापर, ज्यावेळी उच्च न्यायालय किंवा सत्र न्यायालय यांच्यापुढे एखादी कार्यवाही अपील म्हणून पुनरीक्षणासाठी किंवा अन्यथा येईल, त्यावेळी त्यांच्याकडून केला जाईल.

या अधिनियमान्वये शक्ती प्रदान करण्यात न आलेल्या दंडाधिकाऱ्याने अनुसरावयाची कार्यपद्धती.

८. (१) या अधिनियमान्वये मंडळाच्या किंवा बाल न्यायालयाच्या शक्तींचा वापर करण्याची शक्ती प्रदान करण्यात न आलेला कोणताही दंडाधिकारी, या अधिनियमान्वये कोणत्याही उपबंधान्वये त्याच्यापुढे आणण्यात आलेली कोणतीही व्यक्ती (साक्ष देण्याच्या प्रयोजनासाठी असेल त्या व्यतिरिक्त), बाल आहे अशा मताचा असेल तेव्हा, तो अशा मताची नोंद करील आणि बालास कार्यवाहीच्या अभिलेखासह कार्यवाहीची अधिकारिता असलेल्या सक्षम प्राधिकरणाकडे अग्रेषित करील.

(२) पोटकलम (१) अन्वये कार्यवाही ज्याच्याकडे अग्रेषित करण्यात आली असेल ते सक्षम प्राधिकरण, जणू काही त्या बालाला मुळातच त्याच्यापुढे आणण्यात आले असल्याप्रमाणे चौकशी करील.

बालगृहे.

९. (१) या अधिनियमान्वये उपेक्षित बालांना स्वीकारण्यासाठी आवश्यक असतील तितकी बालगृहे, राज्य शासनाला स्थापन करता येतील आणि ती चालवता येतील.

(२) पोटकलम (१) अन्वये स्थापन करण्यात किंवा चालवण्यात येत असणाऱ्या एखाद्या गृहाखेरीज इतर कोणतीही संस्था, या अधिनियमान्वये तेथे पाठवावयाच्या उपेक्षित बालांना स्वीकारण्यास योग्य आहे असे ज्यावेळी राज्य शासनाचे मत असेल त्यावेळी, ते शासन अशा संस्थेला या अधिनियमाच्या प्रयोजनासाठी बालगृह म्हणून प्रमाणित करू शकेल.

(३) या अधिनियमान्वये उपेक्षित बालाला जेथे पाठविण्यात येईल ते प्रत्येक बालगृह, त्या बालासाठी केवळ जागेची, त्याच्या निर्वाहाची आणि शिक्षण, व्यावसायिक प्रशिक्षण आणि पुनर्वसन या सुविधा पुरवील असे नव्हे तर, त्याच्या चारित्र्याच्या व सामर्थ्याच्या विकासाच्या सुविधादेखील पुरवील आणि त्यास नैतिक संकट किंवा शोषण यांपासून स्वतःचे संरक्षण करण्यासाठी आवश्यक प्रशिक्षण देईल आणि त्याच्या व्यक्तिमत्वाची सर्वांगीण वाढ व विकास होत आहे याबाबत खात्री करून घेण्यासाठी विहित करण्यात येतील अशी इतर कामेसुद्धा करील.

(४) राज्य शासन, या अधिनियमाखाली करण्यात आलेल्या नियमाद्वारे बालगृहे चालवण्यासाठी उपबंध करू शकेल व त्यामध्ये त्यांनी राखावयाच्या सेवांचा दर्जा व स्वरूप आणि एखाद्या बालगृहाचे प्रमाण ज्या परिस्थितीत आणि ज्या रीतीने दिले किंवा काढून घेतले जाऊ शकेल ती परिस्थिती आणि रीत यांचा समावेश आहे.

विशेष गृहे.

१०. (१) राज्य शासनाला, या अधिनियमान्वये अपचारी बालांना स्वीकारण्यासाठी आवश्यक असतील तितकी विशेष बालगृहे स्थापन करता येतील आणि ती चालवता येतील.

(२) पोटकलम (१) अन्वये स्थापन करण्यात किंवा चालविण्यात येत असलेल्या एखाद्या गृहाखेरीज इतर कोणतीही संस्था, या अधिनियमान्वये तेथे पाठवावयाच्या अपचारी बालांना स्वीकारण्यासाठी योग्य आहे असे ज्यावेळी राज्य शासनाचे मत असेल त्यावेळी, ते अशा संस्थेला या अधिनियमाच्या प्रयोजनांसाठी विशेष गृह म्हणून प्रमाणित करू शकेल.

(३) या अधिनियमान्वये अपचारी बालाला जेथे पाठविण्यात येईल ते प्रत्येक विशेष गृह, त्या बालासाठी केवळ जागेची, त्याच्या निर्वाहाची आणि शिक्षण, व्यावसायिक प्रशिक्षण व पुनर्वसन या सुविधा पुरवील असे नव्हे तर, त्यांच्या चारित्र्याच्या व सामर्थ्याच्या विकासाच्या सुविधा देखील पुरवील आणि त्याला त्याच्या सुधारण्यासाठी आवश्यक ते प्रशिक्षण देईल आणि त्याच्या व्यक्तिमत्वाची सर्वांगीण वाढ व विकास होत आहे याबाबत खात्री करून घेण्यासाठी विहित करण्यात येईल अशी इतर कामेसुद्धा करील.

(४) राज्य शासन, या अधिनियमान्वये करण्यात आलेल्या नियमांद्वारे विशेष गृहे चालवण्यासाठी उपबंध करू शकेल व त्यामध्ये त्यांनी राखावयाचा सेवांचा दर्जा व स्वरूप आणि एखाद्या विशेष गृहाचे प्रमाणन ज्या परिस्थितीत व ज्या रीतीने दिले किंवा काढून घेतले जाऊ शकेल ती परिस्थिती व रीत यांचा समावेश आहे.

(५) अपचारी बालांचे वय व त्यांनी केलेल्या अपराधांचे स्वरूप यांच्या आधारे त्यांचे वर्गीकरण व विलगीकरण यासाठीही पोटकलम (४) अन्वये करण्यात आलेल्या नियमांद्वारे उपबंध करता येईल.

अभीक्षणगृहे.

११. (१) या अधिनियमान्वये बालांच्या संबंधातील कोणतीही चौकशी प्रलंबित असेल त्या काळामध्ये त्यांना तात्पुरते स्वीकारण्यासाठी आवश्यक असतील तितकी अभीक्षणगृहे राज्य शासनाला स्थापन करता येतील आणि ती चालवता येतील.

(२) पोटकलम (१) अन्वये स्थापन करण्यात किंवा चालवण्यात येत असलेल्या गृहाखेरीज इतर कोणतीही संस्था, या अधिनियमान्वये बालांचा संबंधातील कोणतीही चौकशी प्रलंबित असेल त्या काळामध्ये त्यांना तात्पुरते स्वीकारण्यासाठी योग्य आहे असे ज्यावेळी राज्य शासनाचे मत असेल त्यावेळी, ते, अशा संस्थेला या अधिनियमाच्या प्रयोजनांसाठी अभीक्षण गृह म्हणून मान्यता देऊ शकेल.

(३) या अधिनियमान्वये बालाला जेथे पाठविण्यात येईल ते प्रत्येक अभीक्षणगृह त्या बालासाठी केवळ जागेची, त्याच्या निर्वाहाची आणि वैद्यकीय तपासणी आणि उपचार या सुविधा पुरवील असे नव्हे तर, ते त्याला उपयुक्त कामधंद्याची सुविधासुद्धा पुरवील.

(४) राज्य शासन, या अधिनियमान्वये करण्यात आलेल्या नियमांद्वारे अभीक्षणगृहे चालवण्यासंबंधात उपबंध करू शकेल व त्यामध्ये त्यांनी राखावयाच्या सेवांचा दर्जा व स्वरूप आणि एखाद्या संस्थेला ज्या परिस्थितीत व ज्या रीतीने अभीक्षणगृह म्हणून मान्यता दिली जाऊ शकेल किंवा तिची मान्यता काढून घेतली जाऊ शकेल ती परिस्थिती व रीत यांचा समावेश आहे.

१२. राज्य शासन, या अधिनियमान्वये करण्यात आलेल्या नियमांद्वारे खालील गोष्टींसाठी उपबंध करू शकेल :— अनुरक्षण संघटना.

(क) अनुरक्षण संघटनांची स्थापना किंवा मान्यता आणि या अधिनियमाखालील त्यांची कार्ये परिणामक रीत्या पार पाडण्यासाठी त्यांना वापरता येतील अशा शक्ती;

(ख) बालांनी बालगृहे किंवा विशेष गृहे सोडल्यानंतर त्यांची काळजी घेण्याच्या आणि त्यांना प्रामाणिक, उद्यमशील व उपयुक्त आयुष्य घालवणे शक्य होण्याच्या प्रयोजनासाठी अशा अनुरक्षण संघटनांनी अनुसरावयाच्या अनुरक्षण कार्यक्रमाची एखादी योजना;

(ग) प्रत्येक बालाला, बालगृहातून किंवा, प्रकरणपरत्वे, विशेष गृहातून मुक्त करण्यापूर्वी त्याच्या संबंधात अशा बालाच्या अनुरक्षणाची आवश्यकता व तिचे स्वरूप, अशा अनुरक्षणाची मुदत, त्यावरील देखरेख यासंबंधात परिवीक्षा अधिकाऱ्याद्वारे अहवाल तयार किंवा सादर केला जाणे आणि अशा प्रत्येक बालाच्या प्रगतीचा अहवाल परिवीक्षा अधिकाऱ्याने सादर करणे;

(घ) अशा अनुरक्षण संघटनांनी द्यावयाच्या सेवांच्या दर्जा आणि स्वरूप;

(ङ) बालांच्या अनुरक्षण कार्यक्रमाची योजना परिणामकरीत्या अंमलात आणण्याच्या प्रयोजनासाठी आवश्यक असतील अशा इतर बाबी.

## प्रकरण ३रे

### उपेक्षित बाल

१३. (१) एखादी व्यक्ती ही उघड उघड एखादा उपेक्षित बाल आहे असे जर कोणत्याही पोलीस अधिकाऱ्याचे किंवा राज्य शासनाने यासंबंधात सर्वसाधारण वा विशेष आदेशाद्वारे प्राधिकृत केलेल्या अन्य कोणत्याही व्यक्तीचे किंवा संघटनेचे मत असेल तर, असा पोलीस अधिकारी किंवा अन्य व्यक्ती किंवा संघटना त्या व्यक्तीला एखाद्या मंडळापुढे आणण्यासाठी आपल्या ताब्यात घेऊ शकेल. उपेक्षित बालांना मंडळापुढे हजर करणे.

(२) एखाद्या पोलीस ठाण्याच्या सीमांमध्ये आढळलेल्या कोणत्याही उपेक्षित बालाच्या संबंधात, अशा पोलीस ठाण्याच्या प्रभारी अधिकाऱ्याला माहिती देण्यात आली असेल तेव्हा, तो अशा माहितीच्या सारांशाची या प्रयोजनासाठी ठेवावयाच्या एका नोंदवहीमध्ये नोंद करील, आणि यावर त्याला योग्य वाटेल अशी कार्यवाही करील आणि अशा अधिकाऱ्याला त्या बालाला ताब्यात घ्यावयाचे नसेल तर, तो केलेल्या नोंदीची एक प्रत मंडळाकडे अग्रेषित करील.

(३) पोटकलम (१) अन्वये ताब्यात घेण्यात आलेल्या प्रत्येक बालाला, कोणताही वेळ वाया न घालवता, परंतु असा ताबा घेतल्यापासून चोवीस तासांच्या कालावधीच्या आत, मंडळापुढे आणले जाईल, त्यामधून त्या बालाला ज्या ठिकाणी ताब्यात घेण्यात आले असेल तेथून मंडळापर्यंत करावयाच्या प्रवासासाठी आवश्यक असलेला वेळ वगळण्यात येईल.

(४) पोटकलम (१) अन्वये ताब्यात घेण्यात आलेल्या प्रत्येक बालाला, त्याला, त्याच्या पित्याकडे किंवा मातेकडे किंवा पालकाकडे, ठेवण्यात आले नसेल तर, एखाद्या मंडळापुढे आणणे शक्य होईपर्यंत त्याला एखाद्या अभीक्षणगृहात (परंतु पोलीस ठाण्यात किंवा तुरुंगात नव्हे) पाठविले जाईल.

१४. (१) जर एखादी व्यक्ती ही पोलीस अधिकाऱ्याच्या किंवा अधिकृत व्यक्तीच्या किंवा संघटनेच्या मते, उपेक्षित बाल आहे व त्या बालाचा प्रत्यक्ष ताबा किंवा तिच्यावर नियंत्रण असलेला तिचा पिता किंवा माता किंवा पालक असतील तर, पोलीस अधिकारी किंवा अधिकृत व्यक्ती किंवा संघटना त्या बालाला ताब्यात घेण्याऐवजी, त्या बालाची चौकशी सुरू करण्यासाठी मंडळाकडे एक अहवाल पाठवू शकेल. उपेक्षित बालाचे माता-पिता असतील तेव्हा अनुसरावयाची विशेष कार्यपद्धती.

(२) पोटकलम (१) खालील अहवाल मिळाल्यानंतर, मंडळ, मातेस किंवा पित्यास किंवा पालकास त्या बालाला आपल्यापुढे हजर करण्यास आणि या अधिनियमाच्या उपबंधान्वये त्या बालाला उपेक्षित बाल समजून कार्यवाही का केली जाऊ नये त्याचे कारण दर्शविण्यास सांगू शकेल आणि त्या बालाला आपल्या अधिकारितेतून हलविले किंवा लपविले जाण्याची शक्यता आहे असे मंडळाला दिसून आले तर, ते, त्याला तात्काळ एखाद्या अभीक्षणगृहात किंवा सुरक्षिततेच्या ठिकाणी (बालाला तात्काळ हजर करण्यासाठी आवश्यक असल्यास, झडतीचे अधिपत्र काढून) हलवण्याचा आदेश देऊ शकेल.

१५. (१) जेव्हा एखादा उपेक्षित बाल म्हणून अभिकथित असलेल्या एखाद्या व्यक्तीस एखाद्या मंडळापुढे हजर करण्यात आले असेल तेव्हा, ज्याने त्या बालाला आणले असेल किंवा अहवाल सादर केला असेल त्या पोलीस अधिकाऱ्याची किंवा प्राधिकृत व्यक्तीची किंवा संघटनेची ते तपासणी करील आणि अशा तपासणीचा सारांश अभिलिखित करील आणि विहित रीतीने चौकशी करील आणि त्यास, त्या बालाच्या संबंधात त्याला योग्य वाटतील असे आदेश देता येतील. उपेक्षित बालासंबंधी मंडळाकडून चौकशी.

(२) एखादा बाल हा, उपेक्षित बाल आहे आणि त्याच्या संबंधात कार्यवाही करणे समयोचित आहे अशी मंडळाची खात्री झाली असेल तेव्हा, त्याची बाल्यावस्था संपेपर्यंतच्या कालावधीपर्यंत त्याला एखाद्या बालगृहामध्ये पाठविण्याचा निदेश देणारा आदेश मंडळ देऊ शकेल :

परंतु, मंडळाला अभिलिखित करावयाच्या कारणास्तव अशा वास्तव्याचा कालावधी वाढविता येईल परंतु वास्तव्याचा कालावधी मुलाच्या बाबतीत तो अठरा वर्षांचा होईपर्यंत किंवा मुलीच्या बाबतीत ती वीस वर्षांची होईपर्यंत वाढविता येईल, परंतु यापेक्षा अधिक कालावधी कोणत्याही परिस्थितीत वाढविता येणार नाही :

परंतु, आणखी असे की, प्रकरणाची परिस्थिती लक्षात घेता तसे करणे समयोचित आहे अशी मंडळाची खात्री पटली असेल तर, ते अभिलिखित करावयाच्या कारणांसाठी वास्तव्याचा कालावधी त्याला योग्य वाटेल तितक्या कालावधीपर्यंत कमी करू शकेल.

(३) एखाद्या बालासंबंधीची कोणतीही चौकशी प्रलंबित असेल त्या काळात, त्या बालाला त्याच्या पित्याकडे किंवा मातेकडे किंवा पालकाकडे ठेवण्यात आलेले नसेल तर, त्यास मंडळाच्या आदेशात विनिर्दिष्ट करण्यात येईल अशा कालावधीसाठी एखाद्या अभीक्षणगृहात किंवा सुरक्षिततेच्या ठिकाणी पाठविले जाईल :

परंतु, जर मंडळाच्या मते, बालाचा पिता किंवा माता किंवा पालक त्या बालाची योग्य काळजी घेण्यास आणि त्यावर नियंत्रण ठेवण्यास अयोग्य किंवा असमर्थ असेल किंवा तो, योग्य काळजी घेत नसेल किंवा नियंत्रण ठेवत नसेल तर, कोणत्याही बालाला त्याच्या पित्याकडे, मातेकडे किंवा पालकाकडे ठेवले जाणार नाही.

उपेक्षित बालाला योग्य अभिरक्षेत पाठवण्याची शक्ती.

**१६.** (१) मंडळाला जर तसे योग्य वाटले तर, ते, कलम १५ च्या पोटकलम (२) अन्वये त्या बालाला एखाद्या बालगृहात पाठवण्याचा आदेश देण्याऐवजी त्या बालाच्या पित्याने किंवा मातेने किंवा पालकाने किंवा अन्य योग्य व्यक्तीने त्या बालाचे चांगले वर्तन आणि क्षेम यांसाठी आणि मंडळाला ज्या शर्ती लादणे योग्य वाटेल अशा शर्तींच्या पालनासाठी जबाबदार असण्याबद्दल प्रतिभूतीसह किंवा प्रतिभूतिरहित बंधपत्र करून दिल्यानंतर त्या बालाची त्याच्या पित्याने किंवा मातेने किंवा पालकाने किंवा अन्य योग्य व्यक्तीने काळजी घेण्याबाबत आदेश देऊ शकेल.

(२) पोटकलम (१) खालील आदेश देतेवेळी किंवा त्यानंतर कोणत्याही वेळी, मंडळाला, आणखी असा आदेश देता येईल की, त्या बालाला पहिल्यांदा जास्तीत जास्त तीन वर्षांच्या कालावधीसाठी देखरेखीखाली ठेवण्यात यावे.

(३) पोटकलम (१) किंवा पोटकलम (२) मध्ये काहीही अंतर्भूत असले तरी, परिवीक्षा अधिकाऱ्यांकडून अहवाल मिळाल्यानंतर किंवा अन्यथा मंडळाला कोणत्याही वेळी जर असे दिसून आले की, त्या बालाच्या संबंधात त्याने लादलेल्या शर्तींपैकी कोणत्याही शर्तीचा भंग झालेला आहे, तर ते त्याला योग्य वाटेल अशी चौकशी केल्यानंतर, त्या बालाला एखाद्या बालगृहामध्ये पाठवण्याचा आदेश देऊ शकेल.

हाताबाहेर गेलेले बाल.

**१७.** जेव्हा एखाद्या बालाचा पिता किंवा माता किंवा पालक, मंडळाकडे अशी तक्रार करील की, त्या बालाची योग्य काळजी घेणे व त्यावर नियंत्रण ठेवणे, त्याला शक्य नाही आणि चौकशी केल्यानंतर मंडळाची जर अशी खात्री पटेल की, त्या बालाच्या संबंधात या अधिनियमान्वये कार्यवाही सुरू केली पाहिजे, तर ते त्या बालाला एखाद्या अभीक्षणगृहात किंवा सुरक्षिततेच्या ठिकाणी पाठवू शकेल आणि त्याला योग्य वाटेल अशी आणखी चौकशी करू शकेल. आणि कलम १५ आणि कलम १६ चे उपबंध, शक्य असेल तेथवर, अशा कार्यवाहींना लागू होतील.

## प्रकरण ४थे

### अपचारी बाल

बालांचा जामीन व त्यांची अभिरक्षा.

**१८.** (१) जेव्हा एखादा जामीनयोग्य किंवा बिनजामिनी अपराधाचा आरोप असलेल्या आणि उघड उघड बाल असेल अशा कोणत्याही व्यक्तीला अटक करण्यास किंवा स्थानबद्ध करण्यात आले असेल किंवा ती बाल न्यायालयापुढे हजर झाली असेल किंवा तिला तेथे आणले गेले असेल, तेव्हा अशा व्यक्तीला 'फौजदारी प्रक्रिया संहिता, १९७३' (१९७४ चा २) यामध्ये किंवा त्या त्या वेळी अंमलात असलेल्या कोणत्याही कायद्यामध्ये काहीही अंतर्भूत असले तरी, जामीनदार ठेवून किंवा जामीनदार न ठेवता जामीनावर मुक्त केले जाईल, परंतु अशा मुक्ततेमुळे ती कोणत्याही विख्यात गुन्हेगाराच्या सहवासात येण्याची किंवा त्यामुळे तिला नैतिक धोका होण्याची शक्यता आहे असे मानण्यास वाजवी कारणे दिसून येत असतील तर, तिला अशाप्रकारे मुक्त केले जाणार नाही.

(२) जेव्हा अटक करण्यात आलेल्या अशा व्यक्तीला, पोलीस ठाण्याच्या प्रभारी अधिकाऱ्याकडून पोटकलम (१) अन्वये जामीनावर मुक्त करण्यात आले नसेल तेव्हा, तिला बाल न्यायालयापुढे आणणे शक्य होईतोपर्यंत असा अधिकारी तिला विहित रीतीने एखाद्या अभीक्षणगृहात किंवा सुरक्षिततेच्या ठिकाणी (परंतु पोलीस ठाण्यात किंवा तुरुंगात नव्हे) ठेवण्याची व्यवस्था करील.

(३) जेव्हा अशा बाबतीला बाल न्यायालयाकडून पोटकलम (१) अन्वये जामीनावर मुक्त केले जाणार नाही, तेव्हा तिची तुरुंगात रवानगी करण्याऐवजी, ते न्यायालय तिला तिच्यासंबंधाची चौकशी प्रलंबित असेल त्या काळात त्या आदेशात विनिर्दिष्ट करण्यात येईल तितक्या कालावधीसाठी, एखाद्या अभीक्षण गृहात किंवा सुरक्षिततेच्या ठिकाणी पाठवण्याचा आदेश देईल.

पित्यास किंवा मातेस किंवा पालकास किंवा परिवीक्षा अधिकाऱ्यास माहिती.

१९. ज्यावेळी एखाद्या बालाला अटक करण्यात आली असेल त्यावेळी त्या बालाला ज्या पोलीस ठाण्यावर आणले गेले असेल तेथील प्रभारी अधिकारी त्याच अटकेनंतर शक्य होईल तितक्या लवकर,—

(क) बालाचा पिता किंवा माता किंवा पालक, यांचा पत्ता लागल्यास त्याला अशा अटकेबद्दल माहिती देईल आणि तो बाल जेथे हजर होणार असेल त्या बाल न्यायालयात हजर राहण्याचा निदेश देईल; आणि

(ख) चौकशी करण्यासाठी बाल न्यायालयाला ज्यापासून मदत होण्याची शक्यता असेल असे त्या बालाचे पूर्व चरित्र व कौटुंबिक पूर्ववृत्त आणि इतर महत्त्वाची परिस्थिती यासंबंधीची माहिती मिळविणे शक्य व्हावे म्हणून परिवीक्षा अधिकाऱ्याला अशा अटकेसंबंधीची माहिती देईल.

अपचारी बालांच्या संबंधात बाल न्यायालयाकडून चौकशी.

२०. ज्यावेळी ज्याच्यावर एखाद्या अपराधाचा आरोप करण्यात आला आहे असा एखादा बाल, एखाद्या बाल न्यायालयात उपस्थित होईल किंवा त्याला हजर केले जाईल त्यावेळी, ते बाल न्यायालय कलम ३९ च्या उपबंधान्वये चौकशी करील आणि ते त्या बालाच्या संबंधात, या अधिनियमाच्या उपबंधांच्या अधीनतेने, त्याला योग्य वाटेल असा आदेश देऊ शकेल.

अपचारी बालांच्या संबंधात देता येतील असे आदेश.

२१. (१) एखाद्या बालाने अपराध केला आहे अशी एखाद्या बाल न्यायालयाची चौकशीअंती खात्री पटली असेल तेव्हा, त्या त्या काळी अंमलात असलेल्या अन्य कोणत्याही कायद्यामध्ये एतद्विरुद्ध काहीही अंतर्भूत असले तरी, त्याला तसे योग्य वाटल्यास, ते बाल न्यायालय,—

(क) उपदेश किंवा समज दिल्यानंतर त्या बालाला घरी जाण्याची परवानगी देऊ शकेल;

(ख) चांगले वर्तन ठेवण्याच्या परिवीक्षेच्या शर्तीवर त्या बालाला मुक्त करावे आणि त्यास त्याच्या पित्याने किंवा मातेने किंवा पालकाने किंवा अन्य योग्य व्यक्तीने त्या बालाचे चांगले वर्तन आणि क्षेम यासाठी ते न्यायालय फर्मावील त्याप्रमाणे प्रतिभूतिसह किंवा प्रतिभूतिरहित बंधपत्र करून दिल्यानंतर, त्याच्या अशा पित्याने किंवा मातेने किंवा पालकाने किंवा अन्य योग्य व्यक्तीने काळजी घ्यावी यासाठी तीन वर्षांपेक्षा अधिक नसेल अशा कितीही कालावधीसाठी ठेवावे असा निदेश देऊ शकेल ;

(ग) चांगले वर्तन ठेवण्याच्या परिवीक्षेच्या शर्तीवर त्या बालाला मुक्त करावे आणि त्या बालाचे चांगले वर्तन आणि क्षेम यासाठी तीन वर्षांपेक्षा अधिक नसेल अशा कितीही कालावधीसाठी एखाद्या योग्य संस्थेकडे काळजी घेण्यासाठी ठेवण्याबाबत निदेश देऊ शकेल ;

(घ) (एक) चौदा वर्षांहून अधिक वयाचा मुलगा किंवा सोळा वर्षांहून अधिक वयाची मुलगी यांच्या बाबतीत किमान तीन वर्षांच्या कालावधीसाठी ;

(दोन) अन्य कोणत्याही बालाच्या बाबतीत, जोपर्यंत तो बाल राहणार नाही अशा कालावधीसाठी

त्यास एखाद्या विशेष गृहात पाठविण्याचे निदेश देणारा आदेश देऊ शकेल :

परंतु, जर अपराधाचे स्वरूप आणि प्रकरणाची परिस्थिती विचारात घेऊन, तसे करणे समयोचित आहे याबद्दल त्याची खात्री पटली असेल तर, बाल न्यायालयाला, अभिलिखित करावयाच्या कारणांसाठी, असा वास्तव्याचा कालावधी त्याला योग्य वाटेल अशा कालावधीइतका कमी करता येईल :

परंतु आणखी असे की, बाल न्यायालयाला अभिलिखित करावयाच्या कारणांसाठी अशा वास्तव्याचा कालावधी वाढवता येईल, मात्र अशा वास्तव्याचा कालावधी हा, कोणत्याही प्रकरणी मुलाच्या बाबतीत तो जेव्हा वयाची अठरा वर्षे पूर्ण करील किंवा मुलीच्या बाबतीत ती जेव्हा वयाची वीस वर्षे पूर्ण करील त्या वेळेच्या पलीकडे वाढविला जाणार नाही ;

(ङ) तो बाल चौदा वर्षांहून अधिक वयाचा असेल आणि अर्थार्जन करीत असेल तर त्याला द्रव्य दंड भरण्याचा आदेश देऊ शकेल ;

(२) पोटकलम (१) च्या खंड (ख) खंड (ग) किंवा खंड (ङ) अन्वये ज्यावेळी एखादा आदेश देण्यात आला असेल त्यावेळी, बाल न्यायालयाला त्या बालाच्या आणि सार्वजनिक हिताच्या दृष्टीने, तसे करणे समयोचित वाटल्यास, त्याच्याजोडीने आणखी असा आदेश देता येईल की, अपचारी बाल त्या आदेशात विनिर्दिष्ट करण्यात येईल अशा तीन वर्षांहून अधिक नसलेल्या अशा कालावधीत, त्यामध्ये नाव नमूद करण्यात आलेल्या परिवीक्षा अधिकाऱ्याच्या देखरेखीखाली राहील आणि अशा देखरेखीसंबंधीच्या आदेशात, अपचारी बालाच्या यथोचित देखरेखीसाठी त्याला त्यास योग्य वाटतील अशा शर्ती लादता येतील :

परंतु, परिवीक्षा अधिकाऱ्याकडून अहवाल मिळाल्यानंतर किंवा अन्यथा मागाहून कोणत्याही वेळी त्या बाल न्यायालयाला जर असे दिसून आले की, देखरेखीच्या कालावधीत त्या अपचारी बालाचे वर्तन चांगले नव्हते किंवा बालाला ज्या योग्य संस्थेकडे काळजी घेण्यासाठी त्याला ठेवण्यात आले होते ती यापुढे त्या बालाचे चांगले वर्तन किंवा क्षेम याबद्दल खात्री देण्यास समर्थ किंवा तयार नाही, तर ते त्याला योग्य वाटेल अशी चौकशी केल्यानंतर, त्या अपचारी बालाला एखाद्या विशेष गृहात पाठविण्याचा आदेश देऊ शकेल.

(३) पोटकलम (२) अन्वये देखरेखीसंबंधीचा आदेश देणारे बाल न्यायालय, त्या बालास आणि त्याच्या पित्याला किंवा मातेला किंवा पालकाला किंवा जिकडे काळजी घेण्यासाठी त्याला ठेवण्यात आले असेल अशा इतर योग्य व्यक्तीला किंवा, प्रकरणपरत्वे, योग्य संस्थेला त्या आदेशाच्या अटी व शर्ती समजावून देईल आणि ते, त्या देखरेखीसंबंधीच्या आदेशाची एक प्रत तात्काळ त्या बालास, त्याच्या पित्यास किंवा मातेस किंवा पालकास किंवा इतर योग्य व्यक्तीस किंवा, प्रकरणपरत्वे, योग्य संस्थेस, जामीनदार असल्यास, त्याला आणि परिवीक्षा अधिकाऱ्यास देईल.

(४) या अधिनियमान्वये त्या बालाला ज्याच्या अभिरक्षेत ठेवायचे किंवा सोपवावयाचे ते विशेष गृह किंवा कोणतीही व्यक्ती किंवा संस्था ठरविताना त्या बालाच्या धर्ममताविरुद्ध असणारे धार्मिक शिक्षण त्याला दिले जाणार नाही याची खात्री करून घेण्यासाठी ते न्यायालय त्याच्या धार्मिक संप्रदायाचा योग्य विचार करील.

अपचारी बालाविरुद्ध न द्यावयाचे आदेश.

२२. (१) त्या त्या काळी अंमलात असलेल्या कोणत्याही अन्य कायद्यामध्ये एतद्विरुद्ध काहीही अंतर्भूत असले तरी, कोणत्याही अपचारी बालाला मृत्यूची किंवा कारावासाची शिक्षा दिली जाणार नाही अथवा त्याने द्रव्यदंड भरण्यास कसूर केल्याबद्दल किंवा प्रतिभूती देण्यास कसूर केल्याबद्दल त्याची कारागृहात रवानगी केली जाणार नाही :

परंतु, वयाची चौदा वर्षे पूर्ण केलेल्या एखाद्या बालाने ज्यावेळी एखादा अपराध केला असेल आणि बाल न्यायालयाची खात्री पटली असेल की, केलेला अपराध इतक्या गंभीर स्वरूपाचा आहे किंवा त्याची वागणूक व वर्तन असे राहिले आहे की, त्याच्या स्वतःच्या हिताच्या दृष्टीने किंवा एखाद्या विशेष गृहातील अन्य बालाच्या हिताच्या दृष्टीने त्याला अशा विशेष गृहात पाठविणे योग्य होणार नाही आणि या अधिनियमान्वये उपबंधित केलेल्या अन्य उपाययोजनांपैकी कोणतीही उपाययोजना योग्य किंवा पुरेशी नाही त्यावेळी बाल न्यायालय, त्याला योग्य वाटेल अशा ठिकाणी आणि अशा रीतीने त्या अपचारी बालाला सुरक्षित अभिरक्षेत ठेवण्याचा आदेश देऊ शकेल आणि आदेशांसाठी या प्रकरणाचा अहवाल राज्य शासनाकडे पाठवू शकेल.

(२) बाल न्यायालयाकडून पोटकलम (१) अन्वये अहवाल मिळाल्यावर, राज्य शासन, त्या बालाच्या बाबतीत, त्याला योग्य वाटेल अशी व्यवस्था करू शकेल आणि अशा अपचारी बालाला, त्याला योग्य वाटेल अशा ठिकाणी आणि अशा शर्तींवर स्थानबद्ध करण्याचा आदेश देऊ शकेल :

परंतु, अशाप्रकारे आदेश देण्यात आलेल्या स्थानबद्धतेचा कालावधी हा त्या बालाने केलेल्या अपराधासाठी त्याला जास्तीत जास्त जेवढ्या कालावधीच्या कारावासाची शिक्षा देता आली असती, त्या कालावधीपेक्षा अधिक असणार नाही.

फौजदारी प्रक्रिया संहितेच्या प्रकरण आठ खालील कार्यवाही बालाविरुद्ध सक्षम असणार नाही.

२३. "फौजदारी प्रक्रिया संहिता, १९७३" (१९७४ चा २) यामध्ये एतद्विरुद्ध काहीही अंतर्भूत असले तरी, एखाद्या बालाविरुद्ध उक्त संहितेच्या प्रकरण आठ अन्वये कोणतीही कार्यवाही सुरू केली जाणार नाही आणि कोणताही आदेश दिला जाणार नाही.

बालाची आणि बाल नसलेल्या व्यक्तीची संपरीक्षा संयुक्तपणे होणार नाही.

२४. (१) फौजदारी प्रक्रिया संहिता, १९७३ (१९७४ चा २) याच्या कलम २२३ मध्ये किंवा त्या त्या काळी अंमलात असलेल्या कोणत्याही कायद्यामध्ये काहीही अंतर्भूत असले तरी, कोणत्याही बालावर, बाल नसलेल्या व्यक्तीसमवेत कोणत्याही अपराधाचा आरोप केला जाणार नाही किंवा त्याची संपरीक्षा केली जाणार नाही.

(२) फौजदारी प्रक्रिया संहिता, १९७३ (१९७४ चा २) याच्या कलम २२३ अन्वये किंवा त्या त्या काळी अंमलात असलेल्या इतर कोणत्याही कायद्यान्वये एखाद्या बालावर, एखाद्या अपराधाचा आरोप करण्यात आला असल्यास, पोटकलम (१) मध्ये अंतर्भूत असलेला प्रतिषेध नसता तर, असे बाल आणि बाल नसलेली अन्य कोणतीही व्यक्ती यांच्यावर एकत्रितपणे आरोप करण्यात आला असेल आणि त्यांची एकत्रितपणे संपरीक्षा करण्यात येत असेल तर, त्या अपराधाची दखल घेणारे न्यायालय त्या बालाची आणि त्या अन्य व्यक्तीची वेगवेगळी संपरीक्षा करण्याचा निदेश देईल.

दोषसिद्धीमुळे येणाऱ्या निरर्हतेचे निरसन.

२५. अन्य कोणत्याही कायद्यामध्ये काहीही अंतर्भूत असले तरी, ज्या बालाने अपराध केलेला आहे आणि या अधिनियमाच्या उपबंधान्वये ज्याच्यावर कार्यवाही करण्यात आलेली आहे त्यास, अशा कायद्याखालील अपराधाच्या दोषसिद्धीमुळे येणारी निरर्हता सोसावी लागणार नाही.

२६. या अधिनियमात काहीही अंतर्भूत असले तरी, हा अधिनियम ज्या क्षेत्रामध्ये ज्या दिवशी अंमलात आणला गेला असेल त्या दिवशी त्या क्षेत्रातील कोणत्याही न्यायालयात एखाद्या बालासंबंधात प्रलंबित असलेल्या सर्व कार्यवाह्या त्या न्यायालयात जणू काही हा अधिनियम संमत झाला नसल्याप्रमाणे चालू राहतील आणि त्या बालाने अपराध केला असल्याचे त्या न्यायालयाला आढळून आल्यास, न्यायालय तसा निष्कर्ष अभिलिखित करील आणि त्या बालाच्या संबंधात कोणताही शिक्षादेश देण्याऐवजी त्या बालाला बाल न्यायालयाकडे अग्रेषित करील व ते बाल न्यायालय, या अधिनियमाखालील चौकशीवरून त्या बालाने अपराध केलेला आहे अशी जणू काही त्याची खात्री पटल्याप्रमाणे, या अधिनियमाच्या उपबंधानुसार त्या बालासंबंधात आदेश देईल. प्रलंबित खटल्यांच्या बाबतीतील विशेष उपबंध.

## प्रकरण ५ वे

### समक्ष प्राधिकरणांची सर्वसाधारण कार्यपद्धती आणि अशा प्राधिकरणांच्या आदेशांवरील अपिले आणि त्यांचे पुनरीक्षण

२७. (१) मंडळ किंवा बाल न्यायालय, विहित करण्यात येईल अशा ठिकाणी, अशा दिवशी आणि अशा रीतीने आपल्या बैठकी भरवली. मंडळे व बाल न्यायालये यांच्या बैठकी, इत्यादी.

(२) कलम ७ च्या पोटकलम (२) अन्वये एखाद्या मंडळाच्या किंवा, प्रकरणपरत्वे, एखाद्या बाल न्यायालयाच्या शक्तींचा वापर करण्याची शक्ती प्रदान करण्यात आलेला एखादा दंडाधिकारी या अधिनियमान्वये एखाद्या बालाच्या संबंधातील चौकशी आयोजित करतेवेळी, व्यवहार्य असेल तेथवर, दिवाणी व फौजदारी न्यायालयांच्या साधारण बैठकी ज्या इमारतीत किंवा खोलीत भरवण्यात येत असतील त्यापेक्षा निराळ्या इमारतीत किंवा खोलीत अथवा अशा न्यायालयांच्या साधारण बैठकी ज्या दिवशी किंवा ज्यावेळी भरवण्यात येत असतील त्यापेक्षा वेगळ्या दिवशी व वेळी बैठक भरवील.

(३) एखाद्या बालाच्या संबंधातील, या अधिनियमाखालील चौकशी ही त्वरेने केली जाईल आणि लेखी अभिलिखित करावयाच्या कारणास्तव सक्षम प्राधिकरणाने अन्यथा निदेश दिला नसेल तर, ती सुरू झाल्यापासून सर्वसाधारणपणे तीन महिन्यांच्या कालावधीत पूर्ण केली जाईल.

२८. (१) या अधिनियमात उपबंधित केल्याप्रमाणे असेल ते खेरीजकरून,— सक्षम प्राधिकरणापुढे उपस्थित राहू शकणाऱ्या व्यक्ती.

(क) सक्षम प्राधिकरणाचा कोणताही अधिकारी, किंवा

(ख) सक्षम प्राधिकरणापुढील चौकशीतील पक्षकार, बालाची माता किंवा पिता किंवा पालक आणि पोलीस अधिकारी व विधि व्यवसायी यांच्यासह चौकशीशी थेट संबंधित असलेल्या अन्य व्यक्ती,

(ग) सक्षम प्राधिकरण हजर राहण्यास परवानगी देईल अशा अन्य व्यक्ती,

यांच्याशिवाय अन्य कोणत्याही व्यक्तीला सक्षम प्राधिकरणाच्या कोणत्याही बैठकीला उपस्थित राहता येणार नाही.

(२) पोटकलम (१) मध्ये काहीही अंतर्भूत असले तरी, सक्षम प्राधिकरणाला जर, चौकशीतील कोणत्याही टप्प्यावर त्या बालाच्या हिताच्या दृष्टीने किंवा सभ्यतेच्या वा नीतिमत्तेच्या कारणास्तव, पोलीस अधिकारी, विधि व्यवसायी, माता किंवा पिता, पालक किंवा खुद्द तो बाल, यांनी तेथून निघून जाणे समयोचित आहे असे वाटत असल्यास, सक्षम प्राधिकरण तसा निदेश देऊ शकेल, आणि जर कोणत्याही व्यक्तीने अशा निदेशाचे पालन करण्याचे नाकारले तर, सक्षम प्राधिकरण त्याला घालवून लावू शकेल आणि ते या प्रयोजनासाठी आवश्यक असेल अशा बलाचा वापर करण्याची व्यवस्था करू शकेल.

(३) मंडळाच्या विशेष परवानगीशिवाय कोणतीही विधि व्यवसायी त्या मंडळापुढील कोणत्या खटल्यास किंवा कार्यवाहीत त्याच्यापुढे हजर राहण्यास हक्कदार असणार नाही.

२९. या अधिनियमाच्या कोणत्याही उपबंधान्वये एखाद्या बालाला ज्याच्यापुढे हजर करण्यात आले असेल असे कोणतेही सक्षम प्राधिकरण त्याला जेव्हा योग्य वाटेल तेव्हा त्या बालाचा प्रत्यक्ष ताबा असलेल्या किंवा त्याच्यावर नियंत्रण असलेल्या त्याच्या पित्यास किंवा मातेस किंवा पालकास त्या बालाच्या संबंधातील कोणत्याही कार्यवाहीच्या वेळी उपस्थित राहण्यास फर्मावू शकेल. बालाच्या मातेची किंवा पित्याची अथवा पालकाची उपस्थिती.

३०. जर एखादी चौकशी चालू असताना, कोणत्याही टप्प्यावर चौकशीच्या प्रयोजनार्थ बालाची उपस्थिती आवश्यक नसल्याची सक्षम प्राधिकरणाची खात्री पटली तर, सक्षम प्राधिकरण त्या उपस्थिती-शिवाय भागवू शकेल आणि बालाच्या अनुपस्थितीत चौकशीचे काम चालू ठेवू शकेल. बालाच्या उपस्थिती-वाचून भागवणे.

३१. (१) या अधिनियमान्वये एखाद्या सक्षम प्राधिकरणापुढे आणलेल्या एखाद्या बालाला दीर्घकालीन वैद्यकीय उपचारांची आवश्यकता असणारा एखादा रोग झाला असल्याचे अथवा उपचाराला प्रतिसाद देईल अशी एखादी शारीरिक किंवा मानसिक व्याधी त्यास असल्याचे आढळून येईल तेव्हा, सक्षम प्राधिकरण या अधिनियमान्वये केलेल्या नियमानुसार मान्य ठिकाण म्हणून मान्यता देण्यात आली असेल अशा कोणत्याही ठिकाणी त्या बालाला आवश्यक त्या उपचारासाठी त्याला आवश्यक वाटेल अशा कालावधीसाठी पाठवू शकेल. घातक रोगाने ग्रस्त बालाची मान्यता-प्राप्त ठिकाणी रवानगी आणि त्याची पुढील व्यवस्था.

(२) ज्यावेळी एखादा बाल कुष्ठरोगाने पीडित किंवा विकल मनाचा असल्याचे आढळून येईल तेव्हा, त्याच्यासंबंधात कुष्ठरोगी अधिनियम, १८९८ (१८९८ चा ३) किंवा प्रकरणपरत्वे, भारताचा वेडाबाबत अधिनियम, १९१२ (१९१२ चा ४) यांच्या उपबंधान्वये कार्यवाही केली जाईल.

(३) एखाद्या संसर्गजन्य किंवा स्पर्शजन्य रोगाने पीडित बालाच्या बाबतीत, सक्षम प्राधिकरणाने पोटकलम (१) अन्वये कार्यवाही केली असेल तेव्हा, उक्त बालाला, त्याचा विवाहसाथी असेल तर, त्याच्या किंवा प्रकरणपरत्वे, पालकाच्या स्वाधीन करण्यापूर्वी, सक्षम प्राधिकरण, असे करणे उक्त बालाच्या हिताचे होईल अशी खात्री पटली असेल, त्या बाबतीत त्याच्या विवाहसाथीस, किंवा, प्रकरणपरत्वे, पालकास असा विवाहसाथी किंवा पालक ज्या बालाच्या संबंधात आदेश देण्यात आलेला आहे त्या बालास पुन्हा रोगसंक्रामित करणार नाही, या संबंधात वैद्यकीय तपासणी करवून घेऊन सक्षम प्राधिकरणाची खात्री पटवून देण्यास सांगेल.

**वय गृहीत धरणे आणि ठरवणे.**

३२. (१) ज्यावेळी या अधिनियमाच्या उपबंधापैकी कोणत्याही उपबंधान्वये सक्षम प्राधिकरणापुढे (साक्ष देण्याच्या प्रयोजनाव्यतिरिक्त अन्यथा) आणण्यात आलेली एखादी व्यक्ती ही बाल आहे असे त्याला दिसून येईल त्यावेळी, सक्षम प्राधिकरण, त्या व्यक्तीच्या वयासंबंधात रीतसर चौकशी करील आणि त्या प्रयोजनासाठी आवश्यक असेल असा पुरावा घेईल आणि त्याचे, शक्य असेल तितके बरोबर वय नमूद करून ती व्यक्ती बाल आहे किंवा नाही याबद्दलचा आपला निष्कर्ष अभिलिखित करील.

(२) ज्या व्यक्तीच्या संबंधात आदेश देण्यात आला आहे, ती बाल नसल्याच्या नंतरच्या कोणत्याही पुराव्यामुळेच केवळ सक्षम प्राधिकरणाचा कोणताही आदेश अवैध ठरणार नाही आणि सक्षम प्राधिकरणापुढे अशा रीतीने आणल्या गेलेल्या व्यक्तीचे त्याने नमूद केलेले वय हेच या अधिनियमाच्या प्रयोजनासाठी त्या व्यक्तीचे खरे वय असल्याचे समजण्यात येईल.

**या अधिनियमान्वये आदेश देताना विचारात घ्यावयाची परिस्थिती.**

३३. या अधिनियमान्वये एखाद्या बालाच्या संबंधात कोणताही आदेश देताना, सक्षम प्राधिकरण, पुढील परिस्थिती विचारात घेईल, ती अशी :—

(क) त्या बालाचे वय ;

(ख) त्या बालाची शारीरिक व मानसिक स्वास्थ्यविषयक स्थिती ;

(ग) ज्या परिस्थितीत तो बाल राहात होता आणि राहात आहे ती परिस्थिती ;

(घ) परिवीक्षा अधिकाऱ्याने दिलेले अहवाल ;

(ङ) त्या बालाचे धर्ममत ;

(च) त्या बालाच्या कल्याणाच्या दृष्टीने सक्षम प्राधिकरणाच्या मते विचारात घेणे आवश्यक असेल अशी अन्य परिस्थिती :

परंतु, एखाद्या अपचारी बालाच्या बाबतीत, त्या बालाने अपराध केला आहे असा निष्कर्ष बाल न्यायालयाने अभिलिखित केल्यानंतर वरील परिस्थिती विचारात घेतली जाईल :

परंतु, आणखी असे की, परिवीक्षा अधिकाऱ्याला कलम १९ अन्वये माहिती कळविण्यात आल्यापासून दहा आठवड्यांच्या आत त्याच्याकडून अहवाल मिळाला नाही तर त्याशिवाय कार्यवाही सुरू करण्याची बाल न्यायालयाला मुभा असेल.

**एखाद्या बालाला अधिकारितेबाहेर पाठविणे.**

३४. जर एखाद्या उपेक्षित किंवा अपचारी बालाच्या बाबतीत, ज्या सक्षम प्राधिकरणापुढे त्याला आणण्यात आले असेल त्याच्या अधिकारितेबाहेर त्याचे सर्वसाधारण राहण्याचे ठिकाण असेल तर, सक्षम प्राधिकरण, रीतसर चौकशीनंतर तसे करणे समयोचित आहे अशी त्याची खात्री पटली तर, त्या बालाला त्याचा नातेवाईक किंवा अन्य व्यक्ती, जी त्याला आपल्या सर्वसाधारण राहण्याच्या ठिकाणी ताब्यात घेण्यास व त्याची योग्य काळजी घेण्यास व त्यावर नियंत्रण ठेवण्यास योग्य व तयार असेल तिच्याकडे—मग असे ठिकाण त्याच्या अधिकारितेबाहेर असले तरीही—परत पाठवू शकेल आणि बालाला जेथे पाठविण्यात आले असेल त्याठिकाणी अधिकारितेचा वापर करणाऱ्या सक्षम प्राधिकरणाला, त्यानंतर उद्भवणाऱ्या कोणत्याही बाबतीत मूळ आदेश जणू काही त्याने स्वतःच दिला असल्याप्रमाणे, त्या बालाच्या संबंधात त्याच शक्ती असतील.

**अहवाल गोपनीय समजले जाणे.**

३५. परिवीक्षा अधिकाऱ्याचा अहवाल किंवा सक्षम प्राधिकरणाने कलम ३३ अन्वये विचारात घेतलेली कोणतीही परिस्थिती गोपनीय समजण्यात येईल :

परंतु, सक्षम प्राधिकरण, त्याला तसे योग्य वाटल्यास त्यातील सारांश त्या बालाला किंवा त्याच्या पित्याला किंवा मातेला किंवा पालकाला कळवू शकेल आणि ते अशा बालास, त्याच्या पित्यास किंवा मातेस किंवा पालकास अहवालात नमूद केलेल्या बाबींशी संबद्ध असेल असा पुरावा हजर करण्याची संधी देऊ शकेल.

**या अधिनियमाखालील कोणत्याही कार्यवाहीत गुंतवलेल्या बालांची नावे, इत्यादी प्रकाशित करण्यास मनाई.**

३६. (१) कोणतेही वर्तमानपत्र, मासिक किंवा वार्तापत्र यातील एखाद्या बालाच्या संबंधातील या अधिनियमाखालील कोणत्याही चौकशीच्या कोणत्याही वृत्तांतात त्या बालाचे नाव, पत्ता किंवा शाळा किंवा त्या बालाची ओळख पटण्यास सहाय्यक होईल असा अन्य कोणताही तपशील उघड केला जाणार नाही. तसेच अशा कोणत्याही बालाचे चित्रही प्रकाशित केले जाणार नाही :

परंतु, चौकशी करणाऱ्या प्राधिकरणाला अभिलिखित करावयाच्या कारणांसाठी अशा गोष्टी उघड करणे त्या बालाच्या हिताचे आहे असे त्याचे मत असल्यास, कारणे अभिलिखित करून, त्या गोष्टी उघड करण्यास परवानगी देता येईल.

(२) पोटकलम (१) च्या उपबंधाचे व्यतिक्रमण करणाऱ्या कोणत्याही व्यक्तीस, एक हजार रुपयांपर्यंत असू शकेल इतक्या द्रव्यदंडाची शिक्षा दिली जाईल.

३७. (१) या कलमाच्या उपबंधांच्या अधीनतेने, सक्षम प्राधिकरणाने या अधिनियमान्वये दिलेल्या एखाद्या आदेशामुळे व्यथित झालेल्या कोणत्याही व्यक्तीला, अशा आदेशाच्या दिनांकापासून तीस दिवसांच्या आत सत्र न्यायालयात अपील दाखल करता येईल : अपिले.

परंतु, अपीलकर्त्याला अपील वेळेवर दाखल करण्यास पुरेशा कारणास्तव प्रतिबंध झाला अशी सत्र न्यायालयाची खात्री पटल्यास, ते न्यायालय तीस दिवसांचा उक्त कालावधी संपल्यानंतरही अपील विचारार्थ स्वीकारू शकेल.

(२) (क) अपराध केल्याचे अभिकथित असलेल्या बालाच्या बाबतीत, बाल न्यायालयाने दिलेल्या दोषमुक्तीच्या कोणत्याही आदेशावर, किंवा

(ख) ती व्यक्ती उपेक्षित बाल नसल्याच्या निष्कर्षासंबंधात मंडळाने दिलेल्या कोणत्याही आदेशावर,

कोणतेही अपील दाखल करता येणार नाही.

(३) या कलमान्वये दाखल केलेल्या अपिलात सत्र न्यायालयाने दिलेल्या आदेशावर कोणतेही दुसरे अपील दाखल करता येणार नाही.

३८. उच्च न्यायालय कोणत्याही वेळी, एकतर स्वप्रेरणेने किंवा यासंबंधात आलेल्या अर्जावरून, ज्या कार्यवाहीमध्ये कोणत्याही सक्षम प्राधिकरणाने किंवा सत्र न्यायालयाने एखादा आदेश दिला असेल अशा कोणत्याही कार्यवाहीचा अभिलेख अशा आदेशाची वैधता किंवा औचित्य याबद्दल स्वतःची खात्री करून घेण्यासाठी मागवू शकेल आणि त्यासंबंधात त्याला योग्य वाटेल असा आदेश देऊ शकेल : पुनरीक्षण.

परंतु, उच्च न्यायालय, या कलमान्वये कोणत्याही व्यक्तीला स्वतःची बाजू मांडण्याची वाजवी संधी दिल्याशिवाय, तिला बाधक असेल असा एखादा आदेश देणार नाही.

३९. (१) या अधिनियमाद्वारे स्पष्टपणे अन्यथा उपबंधित करण्यात आले असेल त्याखेरीज, या अधिनियमाच्या कोणत्याही उपबंधान्वये कोणतीही चौकशी करतेवेळी, एखादे सक्षम प्राधिकरण विहित करण्यात येईल अशी कार्यपद्धती अनुसरील आणि तिच्या अधीनतेने शक्य होईल तेथवर, समन्स खटल्यांच्या संपरीक्षांसाठी, फौजदारी प्रक्रिया संहिता, १९७३ (१९७४ चा २) यामध्ये घालून देण्यात आलेली कार्यपद्धती अनुसरील. चौकश्या, अपिले आणि पुनरीक्षण कार्यवाही यासंबंधातील कार्यपद्धती.

(२) या अधिनियमाद्वारे किंवा तदन्वये स्पष्टपणे अन्यथा उपबंधित करण्यात आले असेल त्याखेरीज, या अधिनियमान्वये अपिलांची सुनावणी किंवा पुनरीक्षण यासाठी अनुसरावयाची कार्यपद्धती ही व्यवहार्य असेल तेथवर, फौजदारी प्रक्रिया संहिता, १९७३ (१९७४ चा २) याच्या उपबंधांनुसार असेल.

४०. (१) या अधिनियमाखालील अपील व पुनरीक्षण यांच्याबाबत असलेल्या उपबंधांना बाध न आणता, कोणतेही सक्षम प्राधिकरण, एकतर स्वप्रेरणेने किंवा यासंबंधात आलेल्या अर्जानुसार या अधिनियमान्वये एखाद्या बालाला ज्या संस्थेत पाठवावयाचे असेल त्या संस्थेच्या संबंधातील किंवा जिच्याकडे काळजी घेण्यासाठी किंवा जिच्या देखरेखीखाली एखाद्या बालाला पाठवावयाचे असेल त्या व्यक्तीच्या संबंधातील कोणताही आदेश सुधारू शकेल. आदेश सुधारण्याची शक्ती.

(२) एखाद्या सक्षम प्राधिकरणाने दिलेल्या आदेशातील लेखनदोष अथवा कोणतीही अभावित चूक किंवा वगळणूक यातून उद्भवणारे दोष, सक्षम प्राधिकरण कोणत्याही वेळी एकतर स्वप्रेरणेने किंवा यासंबंधात आलेल्या अर्जावरून सुधारू शकेल.

## प्रकरण ६वे

### बालांच्या संबंधातील विशेष अपराध

४१. (१) एखाद्या बालाचा प्रत्यक्ष ताबा किंवा त्याच्यावर नियंत्रण असलेली जी कोणतीही व्यक्ती त्या बालावर हमला करील, त्याचा परित्याग करील, त्याला उघड्यावर टाकील किंवा त्याच्याकडे जाणीवपूर्वक दुर्लक्ष करील अथवा अशा बालाला अनावश्यक मानसिक किंवा शारीरिक यातना होऊ शकतील अशा रीतीने त्याच्यावर हमला होईल, त्याचा परित्याग केला जाईल, त्यास उघड्यावर टाकले जाईल किंवा तो दुर्लक्षित होईल अशी व्यवस्था करील किंवा असे घडवून आणील तेव्हा तिला सहा महिन्यांपर्यंत असू शकेल इतक्या मुदतीच्या कारावासाची किंवा द्रव्यदंडाची किंवा दोन्ही शिक्षा दिल्या जातील. बालांना क्रूरपणे वागविण्याबद्दल शिक्षा.

(२) राज्य शासनाच्या किंवा त्याने या बाबतीत प्राधिकृत केलेल्या एखाद्या अधिकाऱ्याच्या पूर्व-मंजुरीने तक्रार दाखल करण्यात आली असल्याखेरीज, कोणतेही न्यायालय, पोटकलम (१) अन्वये शिक्षापात्र असलेल्या एखाद्या अपराध्याची दखल घेणार नाही.

४२. (१) जो कोणी कोणत्याही बालाला भीक मागण्याच्या प्रयोजनासाठी राबवील किंवा त्याचा त्यासाठी उपयोग करून घेईल किंवा एखाद्या बालाला भीक मागावयास लावील त्यास तीन वर्षांपर्यंत असू शकेल इतक्या मुदतीच्या कारावासाची शिक्षा दिली जाईल आणि तो द्रव्यदंडासही पात्र असेल. भीक मागण्याच्या कामासाठी बालांना राबविणे.

(२) एखाद्या बालाचा प्रत्यक्ष ताबा किंवा त्याच्यावर नियंत्रण असलेली जी कोणतीही व्यक्ती, पोटकलम (१) अन्वये शिक्षापात्र असलेला अपराध करण्यास अपप्रेरणा देईल तिला एक वर्षापर्यंत असू शकेल इतक्या मुदतीच्या कारावासाची शिक्षा दिली जाईल आणि ती द्रव्यदंडासही पात्र असेल.

(३) या कलमान्वये शिक्षापात्र असलेला अपराध दखलपात्र असेल.

णत्याही बालाला मादक मद्य किंवा गुंगीकारक द्रव्य कवा मन:प्रभावी पदार्थ देण्याबद्दल शास्ती.

४३. जो कोणी, कोणत्याही बालाला सार्वजनिक ठिकाणी मादक मद्य किंवा एखाद्या रीतसर अर्हताप्राप्त वैद्यक व्यवसायीच्या आदेशावरून असेल त्या खेरीज किंवा आजारपणाखेरीज कोणतेही गुंगीकारक द्रव्य किंवा मन:प्रभावी पदार्थ देईल किंवा देण्याची व्यवस्था करील त्यास तीन वर्षापर्यंत असू शकेल इतक्या मुदतीच्या कारावासाची शिक्षा दिली जाईल आणि तो द्रव्यदंडासही पात्र असेल.

ाल कर्मचाऱ्यांचे शोषण.

४४. जो कोणी, एखाद्या बालाला वरकरणी कोणत्याही रोजगारावर लावण्यासाठी प्राप्त करील आणि त्या बालाची मिळकत त्याला देणार नाही किंवा अशी मिळकत आपल्या स्वत:च्या प्रयोजनांसाठी उपयोगात आणील त्यास तीन वर्षापर्यंत असू शकेल इतक्या मुदतीच्या कारावासाची शिक्षा दिली जाईल आणि तो द्रव्यदंडासही पात्र असेल.

पर्यायी शिक्षा.

४५. ज्यावेळी एखाद्या कृतीमुळे किंवा अकृतीमुळे या अधिनियमान्वये आणि अन्य कोणत्याही केंद्रीय किंवा राज्य अधिनियमान्वये शिक्षापात्र असलेला एखादा अपराध घडत असेल त्यावेळी, त्या त्या काळी अंमलात असलेल्या कोणत्याही कायद्यामध्ये काहीही अंतर्भूत असले तरी, अशा अपराधाबद्दल दोषी असल्याचे आढळून आलेला अपराधी ज्यामध्ये अधिक प्रमाणात शिक्षेचा उपबंध करण्यात आला असेल अशाच अधिनियमाखाली शिक्षेस पात्र असेल.

## प्रकरण ७वे

### संकीर्ण

बालांना विना-ारोप सोडण्याची णि स्थानांतरित करण्याची राज्य ासनाची शक्ती.

४६. (१) या अधिनियमात काहीही अंतर्भूत असले तरी, राज्य शासनाला, कोणत्याही वेळी, एखाद्या उपेक्षित किंवा अपचारी बालाला, बाल गृहातून किंवा विशेष गृहातून, एकतर बिनशर्त किंवा त्याला लादणे योग्य वाटतील अशा शर्तींवर सोडण्याचा आदेश देता येईल.

(२) या अधिनियमात काहीही अंतर्भूत असले तरी, राज्य शासनाला पुढीलप्रमाणे आदेश देता येतील :—

(क) एखाद्या उपेक्षित बालाला एका बालगृहातून दुसऱ्या बालगृहाकडे स्थानांतरित करावे;

(ख) अपचारी बालाला एका विशेष गृहातून दुसऱ्या विशेष गृहाकडे किंवा एका विशेष गृहातून, जेथे बोर्स्टल शाळा असेल तेथे, त्या शाळेकडे किंवा एखाद्या विशेष गृहातून एखाद्या बालगृहाकडे स्थानांतरित करावे;

(ग) एखाद्या उपेक्षित बालाला किंवा अपचारी बालाला एखाद्या बाल गृहातून किंवा एखाद्या विशेष गृहातून एखाद्या योग्य व्यक्तीकडे किंवा योग्य संस्थेकडे स्थानांतरित करावे;

(घ) रद्द किंवा समपहृत करण्यात आलेल्या लायसनवर मुक्त करण्यात आलेल्या एखाद्या बालाला, त्याला जेथून मुक्त करण्यात आले असेल, त्या विशेष गृहात किंवा बाल गृहात अथवा अन्य कोणत्याही बाल गृहात, किंवा विशेष गृहात किंवा बोर्स्टल शाळेत पाठवावे.

परंतु, त्या बालाचा बाल गृहातील किंवा विशेष गृहातील किंवा योग्य संस्था किंवा योग्य व्यक्ती यांच्याकडील वास्तव्याचा एकूण कालावधी हा, अशा स्थानांतरणामुळे वाढविला जाणार नाही.

(३) या अधिनियमात काहीही अंतर्भूत असले तरी, राज्य शासनाला, कोणत्याही वेळी, एखाद्या बालाला, या अधिनियमान्वये त्यास जिच्याकडे काळजी घेण्यासाठी ठेवले असेल त्या व्यक्तीकडून एकतर बिनशर्त किंवा शासनाला लादणे योग्य वाटतील अशा शर्तींवर सोडवून घेता येईल.

ा अधिनियमा-ालील बालगृहे, इत्यादी आणि भारताच्या निरनिराळ्या ागातील तशाच ापाची बालगृहे, दी यांच्यातील स्थानांतरण.

४७. (१) कोणत्याही उपेक्षित बालाला किंवा अपचारी बालाला, आपल्या राज्यातील कोणत्याही बालगृहातून किंवा विशेष गृहातून, अन्य राज्यातील कोणत्याही अन्य बालगृहाकडे, विशेष गृहाकडे किंवा तशाच स्वरूपाच्या संस्थेकडे, स्थानांतरित करण्याचा निदेश एखाद्या राज्याचे शासन त्या राज्य शासनाच्या संमतीने देऊ शकेल.

(२) ज्या एखाद्या राज्याचे शासन, सर्वसाधारण किंवा विशेष आदेशाद्वारे, अन्य कोणत्याही राज्यातील बालगृहात किंवा विशेष गृहात किंवा तशाच स्वरूपाच्या संस्थेत स्थानबद्ध असलेल्या एखाद्या उपेक्षित बालाला किंवा अपचारी बालाला आपल्या राज्यातील एखाद्या बालगृहात किंवा विशेष गृहात, ते राज्य शासन अशा स्थानांतरणासाठी आदेश देईल तेव्हा स्वीकारण्यात यावे यासाठी उपबंध करू शकेल आणि अशा स्थानांतरणानंतर जणू काही त्याला अशा बालगृहात किंवा विशेष गृहात पाठविण्याचा आदेश मुळातच या अधिनियमान्वये देण्यात आला होता, अशा प्रकारे या अधिनियमाचे उपबंध अशा बालाला लागू होतील.

**विकल मनाच्या किंवा कुष्ठरोग-पीडित किंवा अंमली पदार्थाचे व्यसन जडलेल्या बालांचे स्थानांतरण.**

४८. (१) या अधिनियमानुसार एखाद्या विशेष गृहात किंवा बालगृहात किंवा संस्थेत ठेवण्यात आलेला कोणताही बाल, कुष्ठरोगपीडित किंवा विकल मनाचा आहे किंवा त्यास कोणत्याही गुंगीकारक औषधिद्रव्याचे अथवा मनःप्रभावी पदार्थाचे व्यसन जडले आहे असे ज्यावेळी राज्य शासनाला आढळून येईल त्यावेळी, त्याला एखाद्या कुष्ठरोग्यांच्या आश्रमात किंवा मनोरुग्णालयात किंवा अंमली पदार्थाचे व्यसन जडलेल्यांच्या उपचार केंद्रात किंवा सुरक्षित अभिरक्षेच्या अन्य ठिकाणी, सक्षम प्राधिकरणाच्या आदेशान्वये त्याला जेवढ्या कालावधीसाठी तेथे ठेवण्यात फर्मावण्यात आले असेल, अशा कालावधीहून अधिक नसेल इतक्या मुदतीसाठी किंवा त्या बालाच्या योग्य उपचारासाठी वैद्यकीय अधिकाऱ्याकडून आवश्यक म्हणून प्रमाणित करण्यात येईल अशा आणखी पुढील कालावधीसाठी हलविण्याचा आदेश ते राज्य शासन देऊ शकेल.

(२) तो बाल कुष्ठरोगमुक्त किंवा मनोवैकल्यमुक्त झाल्याचे किंवा अंमली पदार्थाच्या व्यसनापासून मुक्त झाला आहे असे ज्यावेळी राज्य शासनाला आढळून येईल त्यावेळी, ते राज्य शासन तो बाल अजूनही अभिरक्षेत ठेवण्यास पात्र असेल तर, त्या बालाचा ताबा असलेल्या व्यक्तीला त्याला जेथून हलविण्यात आले असेल त्या विशेष गृहात किंवा बालगृहात किंवा संस्थेत पाठविण्याचा आदेश देऊ शकेल किंवा त्यापुढे तो बाल अभिरक्षेत ठेवण्यास पात्र नसेल तर, त्याला सोडून देण्याचा आदेश देऊ शकेल.

**लायसनवर बाहेर ठेवणे.**

४९. (१) जेव्हा एखाद्या बालाला एखाद्या बालगृहात किंवा विशेष गृहात ठेवण्यात आले असेल तेव्हा, राज्य शासन, त्याला तसे योग्य वाटल्यास, त्या बालगृहातून किंवा विशेष गृहातून त्या बालाला सोडून देऊ शकेल आणि त्याला शिक्षण देण्याच्या आणि एखाद्या उपयुक्त व्यवसायाचे किंवा आजीविकेचे प्रशिक्षण देण्याच्या दृष्टीने त्याला स्वीकारण्यास आणि त्याचा ताबा घेण्यास तयार असलेल्या त्या लायसनमध्ये नाव नमूद केलेल्या एखाद्या जबाबदार व्यक्तीबरोबर त्या लायसनमध्ये विनिर्दिष्ट करण्यात येईल अशा कालावधीसाठी व शर्तींवर, राहण्याची परवानगी देणारे लेखी लायसन देऊ शकेल.

(२) पोटकलम (१) अन्वये देण्यात आलेले असे कोणतेही लायसन, हे त्या लायसनमध्ये विनिर्दिष्ट केलेल्या कालावधीपुरते किंवा ज्या शर्तींवर ते देण्यात आले असेल, त्यापैकी कोणत्याही शर्तीच्या भंगामुळे प्रत्याहृत किंवा समपहृत केले जाईपर्यंत अंमलात राहील.

(३) राज्य शासनाला, कोणत्याही वेळी, लेखी आदेशाद्वारे असे कोणतेही लायसन प्रत्याहृत किंवा समपहृत करता येईल आणि त्या बालाला ज्या बाल गृहातून किंवा विशेष गृहातून सोडण्यात आले असेल तेथे किंवा इतर कोणत्याही बालगृहात किंवा विशेष गृहात परत जाण्याचा आदेश देता येईल, आणि पोटकलम (१) अन्वये दिलेल्या लायसननुसार जिच्याबरोबर किंवा जिच्या देखरेखीखाली राहण्याची परवानगी त्या बालाला देण्यात आली असेल त्या व्यक्तीची इच्छा असल्यास, राज्य शासन तसे करील.

(४) जेव्हा एखादे लायसन प्रत्याहृत किंवा समपहृत करण्यात आले असेल आणि त्या बालाला जेथे परत जाण्याचा निदेश देण्यात आला असेल, त्या विशेष गृहात किंवा बालगृहात परत येण्याचे त्याने नाकारले असेल किंवा परत येण्यात कसूर केली असेल तेव्हा, राज्य शासन, आवश्यक वाटल्यास, त्याला ताब्यात घेण्याची आणि त्या विशेष गृहात किंवा बालगृहात पोचवण्याची व्यवस्था करू शकेल.

(५) या कलमान्वये देण्यात आलेल्या लायसनच्या अनुषंगाने एखादे बाल, एखाद्या विशेष गृहात किंवा बालगृहात ज्या कालावधीत अनुपस्थित असेल तितका कालावधी, त्या विशेष गृहाच्या किंवा बाल गृहाच्या अभिरक्षेत ज्या काळासाठी ठेवला जाण्यास तो दायी असेल त्या कालावधीचाच भाग असल्याचे मानण्यात येईल :

परंतु, ते लायसन प्रत्याहृत किंवा समपहृत करण्यात आल्यानंतर जेव्हा एखाद्या बालाने त्या विशेष गृहात किंवा बालगृहात परत येण्यात कसूर केली असेल तेव्हा, अशा प्रकारे परतण्यात त्याच्याकडून कसूर झाल्यानंतर लोटलेला कालावधी, तो ज्या काळासाठी अभिरक्षेत ठेवला जाण्यास दायी असेल तो कालावधी मोजताना वगळण्यात येईल.

**निसटलेल्या बालांच्या संबंधातील उपबंध.**

५०. त्या त्या काळी अंमलात असलेल्या अन्य कोणत्याही कायद्यामध्ये एतद्विरुद्ध काहीही अंतर्भूत नसले तरी, कोणत्याही पोलीस अधिकाऱ्याला एखाद्या विशेष गृहातून किंवा एखाद्या बालगृहातून किंवा या अधिनियमान्वये जिच्याकडे काळजी घेण्यासाठी त्याला ठेवण्यात आले असेल त्या व्यक्तीकडून निसटून पळालेल्या एखाद्या बालाला वॉरंटाशिवाय ताब्यात घेता येईल आणि तो त्या बालाला त्या विशेष गृहात किंवा त्या बालगृहात किंवा प्रकरणपरत्वे, त्या व्यक्तीकडे परत पाठवील, आणि अशा निसटून जाण्याच्या कारणास्तव त्या बालासंबंधात कोणतीही कार्यवाही दाखल केली जाणार नाही, परंतु ते विशेष गृह, ते बालगृह किंवा ती व्यक्ती, त्या बालाच्या संबंधात आदेश काढणाऱ्या सक्षम प्राधिकरणाला माहिती दिल्यानंतर, त्या बालाविरुद्ध आवश्यक वाटेल अशी उपाययोजना करू शकेल.

**मातापित्यांकडून अंशदान.**

५१. (१) एखाद्या उपेक्षित बालाला किंवा एखाद्या अपचारी बालाला एखाद्या बाल गृहात किंवा एखाद्या विशेष गृहात पाठवण्याचा अथवा त्यास एखाद्या योग्य व्यक्तीकडे किंवा योग्य संस्थेकडे काळजी घेण्यासाठी ठेवण्याचा आदेश काढणारे सक्षम प्राधिकरण, त्या बालाला सांभाळण्यास दायी असलेला पिता किंवा माता किंवा अन्य व्यक्ती यांस, तो तसे करण्यास समर्थ असेल तर, विहित रीतीने, या बालाच्या निर्वाहासाठी अंशदान करण्यास फर्मावणारा आदेश काढू शकेल.

(२) पोटकलम (१) अन्वये कोणताही आदेश काढण्यापूर्वी सक्षम प्राधिकरण त्या बालाला सांभाळण्यास दायी असलेला पिता किंवा माता किंवा इतर व्यक्ती यांच्या परिस्थितीविषयी चौकशी करील आणि कोणताही पुरावा असल्यास, पित्याच्या किंवा मातेच्या किंवा, प्रकरणपरत्वे, अशा अन्य व्यक्तीच्या समक्ष तो अभिलिखित करील.

(३) पोटकलम (१) च्या प्रयोजनांसाठी एखाद्या बालाला सांभाळण्यास दायी असलेली व्यक्ती यामध्ये, अनौरसतेच्या बाबतीत, त्याच्या ब्याज पित्याचा समावेश आहे :

परंतु, ज्यावेळी तो बाल अनौरस असेल आणि त्याच्या निर्वाहासाठी फौजदारी प्रक्रिया संहिता, १९७३ (१९७४ चा २) याच्या कलम १२५ अन्वये आदेश काढण्यात आला असेल त्यावेळी, सक्षम प्राधिकरण, सामान्यतः ब्याज पित्याविरुद्ध अंशदानाचा आदेश काढणार नाही, परंतु ते उक्त, आदेशान्वये निर्वाहासाठी देय म्हणून प्रोद्भूत होणाऱ्या रकमा संपूर्णपणे किंवा त्यांचा काही भाग सक्षम प्राधिकरणाकडून नामनिर्दिष्ट करण्यात येईल अशा व्यक्तीला देण्याचा आदेश देऊ शकेल आणि त्या बालाच्या निर्वाहापोटी त्याच्याकडून अशी रक्कम देण्यात येईल.

(४) या कलमान्वये काढण्यात आलेल्या कोणत्याही आदेशाची अंमलबजावणी फौजदारी प्रक्रिया संहिता, १९७३ (१९७४ चा २) याच्या कलम १२५ अन्वये काढलेल्या आदेशाच्याच रीतीने करता येईल.

निधी. ५२. (१) या अधिनियमान्वये ज्या बालांवर कार्यवाही करण्यात येते त्यांच्या कल्याणासाठी व पुनर्वसनासाठी राज्य शासनाला, त्यास योग्य वाटेल, अशा नावाचा एक निधी निर्माण करता येईल.

(२) कोणत्याही व्यक्तीने किंवा संघटनेने स्वेच्छेने दिलेल्या देणग्या, अंशदाने किंवा वर्गण्या या निधीमध्ये जमा केल्या जातील.

(३) पोटकलम (१) अन्वये निर्माण करण्यात आलेल्या निधी संबंधीचे व्यवहार, विहित करण्यात येतील असे अधिकारी किंवा प्राधिकरण यांच्याकडून, अशा रीतीने आणि अशा प्रयोजनांसाठी केले जातील

सल्लागार मंडळ. ५३. (१) गृहांची स्थापना करणे आणि त्यांचे परिरक्षण, साधनसंपत्ती संघटित करून कामी लावणे, उपेक्षित व अपचारी बालांचे शिक्षण, प्रशिक्षण व पुनर्वसन यांसाठी सोयी पुरवणे आणि संबंधित निरनिराळ्या शासकीय व अशासकीय अभिकरणांमध्ये समन्वय साधणे यांच्याशी संबंधित बाबींवर राज्य शासनाला सल्ला देण्यासाठी त्याला एखादे सल्लागार मंडळ घटित करता येईल.

(२) त्या सल्लागार मंडळामध्ये राज्य शासनाला योग्य वाटतील इतके अधिकारी आणि इतर व्यक्ती असतील आणि त्यांमध्ये तज्ञ व संबद्ध क्षेत्रात कार्य करणाऱ्या स्वयंसेवी संघटनांचे प्रतिनिधी यांचाही समावेश असेल.

वीक्षक. ५४. (१) या अधिनियमान्वये स्थापन करण्यात आलेल्या गृहांपैकी प्रत्येकासाठी राज्य शासनाला वीक्षक म्हणून जास्तीत जास्त तीन अशासकीय व्यक्तींना नामनिर्देशित करता येईल.

(२) एखाद्या गृहासाठी पोटकलम (१) अन्वये नामनिर्देशित करण्यात आलेला वीक्षक ठराविक कालांतराने अशा गृहाला भेट देईल आणि राज्य शासनाला अहवाल देईल.

अभिरक्षकाचे बालावरील नियंत्रण. ५५. एखाद्या बालाला या अधिनियमाच्या अनुषंगाने जिच्या अभिरक्षेत ठेवण्यात आले असेल अशा कोणत्याही व्यक्तीचे, तो आदेश अंमलात असताना, ती त्या बालाची माता किंवा पिता असली तर त्याच्यावर तिचे जसे नियंत्रण राहिले असते तसेच नियंत्रण असेल, आणि ती त्याच्या निर्वाहास जबाबदार असेल आणि त्याच्या पिता किंवा माता किंवा अन्य कोणतीही व्यक्ती त्याच्यावर हक्क सांगत असली तर, सक्षम प्राधिकरणाने नमूद केलेल्या कालावधीत तो बाल त्याच्याच अभिरक्षेत राहणे चालू असेल :

परंतु, अशा अभिरक्षेत असताना कोणत्याही बालाला, सक्षम प्राधिकरणाच्या परवानगीशिवाय उचलून नेले जाणार नाही.

या अधिनियमाच्या प्रारंभी शिक्षा भोगत असलेला अपचारी बाल. ५६. हा अधिनियम अंमलात आणला गेला असेल अशा कोणत्याही क्षेत्रात, राज्य शासनाला असा निदेश देता येईल की, या अधिनियमाच्या प्रारंभी कारावासाची शिक्षा भोगत असलेल्या कोणत्याही अपचारी बालाला, अशी शिक्षा भोगायला लावण्याऐवजी त्याच्या शिक्षेच्या उर्वरित कालावधीसाठी त्याला राज्य शासनाला योग्य वाटेल अशा ठिकाणी आणि अशा रीतीने एखाद्या विशेष गृहात पाठवण्यात यावे किंवा सुरक्षित अभिरक्षेत ठेवण्यात यावे; आणि जणू काही एखाद्या बाल न्यायालयानेच त्याला अशा विशेष गृहात पाठविण्याचा किंवा, प्रकरणपरत्वे, कलम २२ च्या पोटकलम (२) अन्वये स्थानबद्ध ठेवण्याचा आदेश दिला असल्याप्रमाणे या अधिनियमाचे उपबंध त्या बालाला लागू होतील.

अधिकाऱ्यांची नियुक्ती. ५७. (१) राज्य शासनाला या अधिनियमाची प्रयोजने पार पाडण्यासाठी, विशेष गृहे, बालगृहे, अभीक्षणगृहे किंवा अनुरक्षण संघटना यांच्या निरीक्षणासाठी आवश्यक वाटतील तितके परिवीक्षा अधिकारी, आणि असे अन्य अधिकारी यांची नियुक्ती करता येईल.

(२) परिवीक्षा अधिकाऱ्यांची खालील कर्तव्ये असतील :—

(क) सक्षम प्राधिकरणाच्या निदेशानुसार त्या प्राधिकरणाला चौकशी करण्यास साहाय्य होण्याच्या दृष्टीने, ज्याच्यावर अपराध केल्याचा आरोप ठेवण्यात आलेला आहे अशा कोणत्याही बालाचे पूर्वचारित्र्य आणि कौटुंबिक पूर्ववृत्त याबद्दल चौकशी करणे;

(ख) परिवीक्षा अधिकाऱ्याला योग्य वाटेल अशा कालांतराने उपेक्षित व अपचारी बालांची भेट घेणे;

(ग) कोणत्याही उपेक्षित किंवा अपचारी बालाच्या वर्तणुकीबद्दल सक्षम प्राधिकरणाला अहवाल देणे;

(घ) उपेक्षित किंवा अपचारी बालांना सल्ला देणे व सहाय्य करणे आणि आवश्यकता असल्यास, त्यांना योग्य अशी नोकरी शोधून देण्याचा प्रयत्न करणे;

(ङ) ज्या वेळी एखाद्या उपेक्षित किंवा अपचारी बालाला काही विवक्षित शर्तींवर एखाद्या व्यक्तीकडे किंवा संस्थेकडे काळजी घेण्यासाठी ठेवण्यात आले असेल तेव्हा तिच्याकडून अशा शर्तींचे पालन होत आहे किंवा कसे याकडे लक्ष देणे;

(च) विहित करण्यात येतील अशी इतर कर्तव्ये पार पाडणे.

(३) यासंबंधात राज्य शासनाने शक्ती प्रदान केलेल्या कोणत्याही अधिकाऱ्याला, कोणत्याही विशेष गृहात, बालगृहात, अभीक्षणगृहात किंवा अनुरक्षण संघटनेत प्रवेश करता येईल आणि त्यांच्या सर्व विभागांची आणि सर्व कागदपत्रे, नोंदवह्या आणि त्यांच्याशी संबंधित लेखे यांचे संपूर्ण निरीक्षण करता येईल आणि तो अशा निरीक्षणाचा अहवाल राज्य शासनाला सादर करील.

**या अधिनियमान्वये नियुक्त केलेले अधिकारी लोकसेवक असणे.**

५८. या अधिनियमाच्या अनुसार नियुक्त करण्यात आलेले परिवीक्षा अधिकारी आणि इतर अधिकारी हे भारतीय दंड संहिता (१८६० चा ४५) याच्या कलम २१ च्या अर्थांतर्गत लोकसेवक असल्याचे मानण्यात येईल.

**बंधपत्रासंबंधीची कार्यपद्धती.**

५९. फौजदारी प्रक्रिया संहिता, १९७३ (१९७४ चा २) याच्या प्रकरण तेहतीसचे उपबंध, शक्य होईल तेथवर, या अधिनियमान्वये घेण्यात आलेल्या बंधपत्रांना लागू होतील.

**शक्तींचे प्रत्यायोजन.**

६०. राज्य शासनाला, सर्वसाधारण किंवा विशेष आदेशाद्वारे, असा निदेश देता येईल की, या अधिनियमान्वये त्याच्याकडून वापरण्याजोगी असलेली कोणतीही शक्ती, त्या आदेशात विनिर्दिष्ट करण्यात येईल अशा परिस्थितीत आणि जर काही शर्ती असल्यास त्यानुसार, त्या शासनाच्या अधीन असलेल्या एखाद्या अधिकाऱ्याकडून वापरली जाऊ शकेल.

**सद्भावपूर्वक केलेल्या कार्यवाहीस संरक्षण.**

६१. या अधिनियमान्वये किंवा त्याखालील करण्यात आलेले कोणतेही नियम किंवा आदेश यांच्या अनुसार सद्भावपूर्वक करण्यात आलेल्या किंवा करणे उद्देशित असलेल्या कोणत्याही गोष्टीबद्दल राज्य शासनाच्या किंवा कोणत्याही परिवीक्षा अधिकाऱ्याविरुद्ध किंवा या अधिनियमान्वये नियुक्त करण्यात आलेल्या कोणत्याही अन्य अधिकाऱ्याविरुद्ध कोणताही दावा किंवा इतर वैध कार्यवाही दाखल करता येणार नाही.

**नियम करण्याची शक्ती.**

६२. (१) राज्य शासनाला, शासकीय राजपत्रातील अधिसूचनेद्वारे या अधिनियमाची प्रयोजने पार पाडण्यासाठी नियम करता येतील.

(२) विशेषतः आणि पूर्ववर्ती शक्तीच्या सर्वसाधारणतेस बाध न आणता, असे नियम पुढीलपैकी सर्व किंवा कोणत्याही बाबींसाठी उपबंध करू शकतील, त्या अशा :—

(क) सक्षम प्राधिकरण आपल्या बैठकी कोणकोणत्या ठिकाणी, कोणकोणत्या दिवशी, कोणकोणत्या वेळी आणि कशा रीतीने भरवील, ती ठिकाणे, ते दिवस, त्या वेळा व ती रीत;

(ख) या अधिनियमाखालील चौकश्या करताना एखाद्या सक्षम प्राधिकरणाने अनुसरावयाची कार्यपद्धती आणि घातक रोगाने किंवा मानसिक व्याधीने पीडित बालांना हाताळण्याची पद्धत;

(ग) ज्या परिस्थितीत आणि ज्या शर्तींच्या अधीनतेने एखाद्या संस्थेस विशेष गृह किंवा बालगृहे म्हणून प्रमाणित करता येईल किंवा तिला अभीक्षणगृह म्हणून मान्यता देता येईल आणि ते प्रमाणन किंवा मान्यता काढून घेता येईल ती परिस्थिती व त्या शर्ती ;

(घ) विशेष गृहे, बालगृहे आणि अभीक्षणगृहे यांचे अंतर्गत व्यवस्थापन आणि त्यांनी राखावयाचा सेवांचा दर्जा व स्वरूप ;

(ङ) विशेष गृहे, बालगृहे आणि अभीक्षणगृहे यांची कार्ये आणि जबाबदाऱ्या ;

(च) विशेष गृहे, बालगृहे, अभीक्षणगृहे व अनुरक्षण संघटना यांचे निरीक्षण ;

(छ) अनुरक्षण संघटनांची स्थापना, व्यवस्थापन आणि कार्ये, एखाद्या संस्थेस अनुरक्षण संघटना म्हणून मान्यता ज्या परिस्थितीत आणि ज्या शर्तींच्या अधीनतेने देता येईल ती परिस्थिती व त्या शर्ती आणि कलम १२ मध्ये निर्देश केल्या असतील अशा इतर बाबी;

(ज) परिवीक्षा अधिकाऱ्यांच्या अर्हता आणि कर्तव्ये ;

(झ) या अधिनियमाची प्रयोजने पार पाडण्यासाठी नियुक्त केलेल्या व्यक्तींची भरती व प्रशिक्षण आणि त्यांच्या सेवेच्या अटी व शर्ती ;

(ञ्) उपेक्षित किंवा अपचारी बाल असलेल्या एखाद्या मुलीस ज्या शर्तीच्या अधीनतेने एका ठिकाणाहून दुसऱ्या ठिकाणी संरक्षणास नेता येईल त्या शर्ती; आणि एखाद्या बालाला एखाद्या सक्षम प्राधिकरणाच्या अधिकारितेबाहेर ज्या रीतीने पाठवता येईल ती रीत;

(ट्) पित्याने किंवा मातेने किंवा पालकाने बालाच्या निर्वाहासाठी द्यावयाच्या अंशदानासाठी ज्या रीतीने आदेश देता येईल ती रीत;

(ठ्) कलम ५२ अन्वये निर्माण करण्यात आलेल्या निधीचा व्यवहार कोणते अधिकारी वा प्राधिकारी, कोणत्या रीतीने आणि कोणत्या प्रयोजनांसाठी पाहतील, ते अधिकारी/प्राधिकारी, ती रीत व ती प्रयोजने;

(ड्) एखाद्या बालाला लायसनावर कोणत्या शर्तींवर बाहेर पाठवता येईल त्या शर्ती आणि अशा लायसनाचा नमुना व शर्ती;

(ढ्) बालांना ज्या शर्तींच्या अधीनतेने पित्याकडे किंवा मातेकडे किंवा पालकाकडे किंवा या अधिनियमाखालील इतर योग्य व्यक्तीकडे किंवा योग्य संस्थेकडे काळजी घेण्यासाठी ठेवता येईल त्या शर्ती आणि अशा रीतीने ठेवण्यात आलेल्या बालांच्या संबंधात अशा व्यक्ती किंवा संस्था यांच्यावरील आबंधने;

(ण्) जी विहित केली पाहिजे किंवा करता येईल अशी अन्य कोणतीही बाब.

(३) एखाद्या राज्य शासनाने या अधिनियमान्वये केलेला प्रत्येक नियम, तो करण्यात आल्यानंतर शक्य होईल तितक्या लवकर त्या राज्याच्या विधानमंडळासमोर ठेवला जाईल.

**निरसन व व्यावृत्ती.** ६३. जर कोणत्याही राज्यात हा अधिनियम अंमलात येण्याच्या दिनांकाच्या लगतपूर्वी या अधिनियमानुरूप असलेला कोणताही कायदा त्या राज्यात अंमलात असेल तर, तो कायदा उक्त दिनांकास निरसित झालेला असेल :

परंतु, निरसनामुळे पुढील गोष्टींवर परिणाम होणार नाही.

(क्) अशा रीतीने निरसित झालेल्या कोणत्याही कायद्याचे पूर्व प्रवर्तन किंवा त्याखाली यथोचित रीत्या करण्यात आलेली कोणतीही कृती किंवा तदन्वये सोसण्यात आलेली कोणतीही गोष्ट;

(ख्) अशा रीतीने निरसित झालेल्या कोणत्याही कायद्यान्वये संपादित, उपार्जित किंवा प्रोद्भूत झालेला कोणताही अधिकार, विशेषाधिकार, आबंधन किंवा दायित्व; किंवा

(ग्) अशा रीतीने निरसित झालेल्या कोणत्याही कायद्याविरुद्ध करण्यात आलेल्या कोणत्याही अपराधांबाबत ओढवून घेतलेली कोणतीही शास्ती, समपहरण, किंवा शिक्षा ; किंवा

(घ्) पूर्वोक्ताप्रमाणे असा कोणताही अधिकार, विशेषाधिकार, आबंधन, दायित्व, शास्ती, समपहरण किंवा शिक्षा यासंबंधातील कोणतेही अन्वेषण, वैध कार्यवाही किंवा इलाज;

आणि जणू काही हा अधिनियम संमतच करण्यात आलेला नसल्याप्रमाणे, असे कोणतेही अन्वेषण, वैध कार्यवाही किंवा इलाज सुरू करता येईल; चालू ठेवता येईल किंवा अंमलात आणता येईल आणि अशी कोणतीही शास्ती, समपहरण किंवा शिक्षा लादता येईल.